पाहिजेत
ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास पाहिजेत
नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/ वायरमन, 12 वी पास फ्रेश/ अनुभवी मुले त्वरित पाहिजे.
संपर्क - 9923155996

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

व्यवसाय
आपण ज्येष्ठ, सेवानिवृत्त, गृहिणी आहात का?
आपला वेळ, शिक्षण यांचा उपयोग करून नामाकित कंपनीत आपल्याला वेळेत कामाची सुवर्णसंधी!
निश्चित उत्पन्न ■ कोणतीही गुंतवणूक नाही
संपर्क : 8087459854

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २६१ वा | गुरुवार, दि. २८ मे २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

कागदावर टंचाई कमी, वास्तवात महाराष्ट्र तहानला; ९ हजार गावे पाण्यासाठी हवालदिल!

टँकरमुक्तीचा दावा फोल

पाणीटंचाईवर प्रशासनाचा पडदा

ग्रामीण महाराष्ट्रात भीषण जलसंकट!

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- राज्यातील अनेक भागांमध्ये उन्हाळ्याची तीव्रता वाढत असताना ग्रामीण महाराष्ट्राला भीषण पाणीटंचाईने अक्षरशः ग्रासले आहे. मात्र, शासनाच्या अधिकृत आकडेवारीत आणि प्रत्यक्ष वास्तवात मोठी तफावत असल्याचे समोर आले आहे. राज्य शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या साप्ताहिक अहवालानुसार, राज्यातील १५ जिल्ह्यांमधील ६३३ गावे आणि १,६५२ वाड्या-वस्त्या टंचाईग्रस्त घोषित करण्यात आल्या असून, या ठिकाणी ७०६ टँकर्सद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. यामध्ये ३३ शासकीय तर ६७३ खासगी टँकर्सचा समावेश आहे.

मात्र, ही केवळ कागदोपत्री आकडेवारी असल्याचा आरोप होत असून प्रत्यक्षात राज्यातील तब्बल आठ ते नऊ हजार गावे, वाड्या आणि पाडे तीव्र पाणीटंचाईचा सामना करत असल्याचे वास्तव समोर येत आहे. प्रशासनाच्या निकषांमध्ये फक्त महसुली गावे, अधिकृत टँकर मंजुरी झालेली ठिकाणे आणि शासनाने अधिग्रहित केलेल्या विहिरींचीच नोंद घेतली जात असल्याने हजारो वस्त्या सरकारी आकडेवारीबाहेर राहिल्याचे चित्र आहे.

दरम्यान, पावसाळ्यास अजून काही आठवड्यांचा कालावधी बाकी असल्याने परिस्थिती अधिकच गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. ग्रामीण भागात नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मैलोनमैल पायपीट करावी लागत असून अनेक गावांमध्ये दिवसाआड किंवा तीन दिवसांनी पाणीपुरवठा होत आहे. महिलांना आणि शेतकरी

कुटुंबांना या संकटाचा सर्वाधिक फटका बसत आहे.

प्रमुख धरणांमधील जलसाठाही चिंताजनक पातळीवर पोहोचला आहे. नागपूर जिल्ह्यातील तोतलाडोह धरणात केवळ २६.२० टक्के उपयुक्त जलसाठा शिल्लक आहे. सातारा जिल्ह्यातील कोयना धरणात २४.१५ टक्के, भंडारा येथील गोसीखुर्द प्रकल्पात २१.०५ टक्के, तर सोलापूरच्या उजनी धरणात फक्त १६.८३ टक्के जलसाठा उरला आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील जायकवाडी धरणात १६.३० टक्के तर पुणे जिल्ह्यातील भाटघर धरणात अवघा १४.५० टक्के जलसाठा उपलब्ध असल्याने आगामी काळात पाणीपुरवठ्याचे मोठे संकट निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

दरम्यान, टँकर मंजुरी प्रक्रियेमध्ये असलेल्या जाचक अटी आणि 'टँकरमुक्त जिल्हा' दाखवण्याच्या प्रशासकीय दबावामुळे अनेक गावांचे प्रस्ताव लालफितीत अडकून पडल्याचा आरोप स्थानिक पातळीवरून होत आहे. अनेक गावांमध्ये पाण्याची तीव्र टंचाई असतानाही अधिकृत मंजुरी मिळत नसल्याने नागरिकांना स्वतःच्या खर्चाने पाणी विकत घ्यावे लागत असल्याचे चित्र आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, राज्यातील १,२०५ गावांमध्ये प्रशासनाने खासगी विहिरी अधिग्रहित केल्या आहेत. याशिवाय ७०६ गावांमध्ये टँकर्सद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. म्हणजेच जवळपास २,००० मुख्य गावे सध्या थेट सरकारी मदतीवर अवलंबून आहेत. मात्र, या गावांच्या अंतर्गत येणाऱ्या लहान वाड्या, वस्त्या आणि पाड्यांचा विचार केला असता प्रत्यक्ष टंचाईग्रस्त भागांची संख्या आठ ते नऊ हजारांच्या घरात पोहोचत असल्याचे सांगितले जात आहे.

विशेष म्हणजे, शासनाच्या निकषांनुसार जोपर्यंत विहीर अधिग्रहणाचा पर्याय उपलब्ध असतो, तोपर्यंत संबंधित गावाला टँकर मंजूर केला जात नाही. त्यामुळे विहिरींवर अवलंबून असलेल्या अनेक गावांची नोंद टँकरग्रस्त गावांच्या यादीत दिसून येत नाही. परिणामी, अधिकृत आकडेवारी आणि प्रत्यक्ष परिस्थितीमध्ये मोठी दरी निर्माण झाली आहे.

दुष्काळग्रस्त भागांतील नागरिकांनी प्रशासनाने तातडीने जलद उपाययोजना राबवाव्यात, अतिरिक्त टँकर्स उपलब्ध करून द्यावेत, बंद पडलेल्या पाणीपुरवठा योजनांची दुरुस्ती करावी तसेच नव्या जलस्रोतांचा शोध घेऊन नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी केली आहे. पावसाळा लांबल्यास राज्यातील अनेक भागांमध्ये पाणीस्थिती आणखी भयावह होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

शेतकऱ्यांचे ऊस बिलं थकवले

राज्यातील ७ साखर कारखान्यांवर आरआरसी कारवाई

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या थकीत बिलांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून साखर आयुक्तांनी थकबाकीदार साखर कारखान्यांविरोधात कठोर भूमिका घेतली आहे. सोलापूर जिल्ह्यातील गोकुळ शुगर कारखान्यावर आधीच आरआरसी (रेव्हेन्यू रिकव्हरी सर्टिफिकेट) कारवाई करण्यात आली होती.

त्यानंतर आता आणखी सहा साखर कारखान्यांवरही साखर आयुक्तांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

राज्यातील विविध जिल्ह्यांतील या सात कारखान्यांकडे तब्बल २३२ कोटी ८० लाख रुपयांची ऊस बिलाची थकबाकी असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले असून थकीत रकमेच्या वसुलीसाठी प्रशासनाने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.

सात कारखान्यांवर आरआरसी कारवाई

साखर आयुक्त कार्यालयाने सोलापूर, धाराशिव, अहिल्यानगर, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील प्रत्येकी एका साखर कारखान्यावर आरआरसी कारवाई केली आहे. यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील भीमा टाकळी सिकंदर आणि श्री संत कुर्मदास माढा या कारखान्यांचाही समावेश आहे.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांना एफआरपीप्रमाणे वेळेत पैसे देणे बंधनकारक असतानाही अनेक कारखान्यांनी मोठ्या प्रमाणात थकबाकी ठेवली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले असून आगामी हंगामासाठीही अडचणी निर्माण होत आहेत.

मागील आठवड्यात झाली होती सुनावणी

थकीत ऊस बिलाच्या प्रकरणात साखर आयुक्तांनी मागील आठवड्यात राज्यातील ५४ साखर कारखान्यांची सुनावणी घेतली होती. या सुनावणीत अनेक कारखान्यांनी समाधानकारक उत्तर न दिल्याने अखेर सात कारखान्यांवर आरआरसी कारवाई करण्यात आली.

साखर आयुक्तांनी स्पष्ट शब्दांत इशारा दिला असून शेतकऱ्यांचे पैसे थकवणाऱ्या कारखान्यांवर पुढील काळात आणखी कठोर कारवाई केली जाईल, असे संकेत दिले आहेत.

आणखी कारखाने रडारवर

सोलापूर जिल्ह्यातील काही अन्य साखर कारखान्यांकडेही मोठ्या प्रमाणात ऊस बिलाची थकबाकी असल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत आणखी काही कारखान्यांवर आरआरसी कारवाई होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

शेतकरी संघटनांनीही या कारवाईचे स्वागत केले असून थकीत रक्कम तातडीने मिळावी, अशी मागणी केली आहे. ऊस उत्पादकांना वेळेवर पैसे मिळाले नाहीत तर शेतीच्या खर्चाचे नियोजन करणे कठीण होत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

कोणत्या कारखान्याकडे किती थकबाकी?

- गोकुळ शुगर, थोत्री - १३० कोटी ४६ लाख रुपये
- भीमा टाकळी सिकंदर - ३० कोटी २३ लाख रुपये
- श्री संत कुर्मदास, माढा - १५ कोटी २८ लाख रुपये
- भीमाशंकर, धाराशिव - १२ कोटी २७ लाख रुपये
- केदारेश्वर, अहिल्यानगर - २२ कोटी ४५ लाख रुपये
- एस. जे. शुगर - २ कोटी रुपये
- सचिन घायाळ शुगर, छत्रपती संभाजीनगर - १९ कोटी ५० लाख रुपये

सोलापूर विधान परिषदेला धक्कादायक ट्विस्ट!

3 महिला नेत्यांच्या नावांची जोरदार चर्चा

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- भाजपासाठी एकतर्फी निवडणूक असणाऱ्या सोलापूर विधान परिषदेसाठी महिला उमेदवार देण्याबाबत पक्षाकडून जोरदार हालचाली सुरू झाल्या असून आता यासाठी रश्मी बागल, सामाजिक कार्यकर्त्या डॉक्टर श्रद्धा जवंजाळ आणि राजश्री नागणे या तीन नेत्यांची नावे रेसमध्ये आल्याची माहिती समोर येत आहे.

सोलापूर विधान परिषदेच्या 616 मतांपैकी साडेचारशे पेक्षा जास्त मते भाजप आणि मित्रांकडे असून शिवसेना आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या मतांची बेरीज केल्यास विरोधकांकडे अगदी मोजकी मते शिल्लक राहत आहेत.

अशावेळी महिला आरक्षण धोरण डोक्यात ठेवून सहज निवडून येणाऱ्या जागांवर महिलांना संधी देण्यासाठी भाजपकडून जोरदार हालचाली सुरू झाले आहेत. त्यामुळे भाजपकडून अजून कोणीही उमेदवारी अर्ज घेण्यासाठी पक्षाने सूचना दिलेल्या नाहीत. सध्या सोलापूर विधान परिषदेसाठी जिल्हा परिषद सदस्य रश्मी बागल, सामाजिक कार्यकर्त्या श्रद्धा जवंजाळ आणि भाजप महिला आघाडीतील कोअर लीडर असणाऱ्या राजश्री नागणे ही तीन नावे पुन्हा एकदा नव्याने चर्चेत आली आहेत.

सध्या भाजपकडून माजी आमदार प्रशांत परिचारक, राजेंद्र राऊत, विक्रम देशमुख, शिवाजीराव सावंत आणि रणजितसिंह मोहिते पाटील यांचे उमेदवारीसाठी प्रयत्न सुरू आहेत. मात्र सोलापूरच्या जागेचा निर्णय मुख्यमंत्री हे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या सल्ल्याने घेणार असल्याची माहिती आहे. अशावेळी पक्षाकडून सर्वात सेफ असणाऱ्या सोलापूर विधान परिषदेसाठी महिला उमेदवार देऊन महिला आरक्षण धोरण भाजप राबवित असल्याचे दाखवून द्यायचे आहे. त्यामुळेच सोलापूर विधान परिषदेसाठी महिलांना संधी देण्याबाबत जोरदार हालचाली सुरू झाले आहेत. आता उमेदवारी दाखल करण्यासाठी मोजकाच कालावधी शिल्लक असताना अनपेक्षित नाव पुढे येण्याची शक्यता आहे.

मुलांमधील मधुमेहाचे लवकर निदान करण्यावर भर

शाळा-अंगणवाड्यांमध्ये तपासणी होणार

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- देशात वाढत्या बालमधुमेहाच्या समस्येची गंभीर दखल घेत केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने बालमधुमेहाच्या निदान, उपचार आणि देखरेखीबाबत सर्वसमावेशक मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहेत.

या निर्णयामुळे देशातील लाखो मुलांना वेळेवर आणि मोफत उपचार मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.नवीन मार्गदर्शक तत्त्वे जन्मापासून ते १८ वर्षांपर्यंतच्या मुलांसाठी तयार करण्यात आली असून, बालमधुमेहाचे लवकर

निदान करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. अनेकदा मुलांमधील मधुमेहाची लक्षणे वेळेत ओळखली जात नसल्याने आजार गंभीर अवस्थेत पोहोचतो. ही परिस्थिती टाळण्यासाठी शाळा, अंगणवाडी आणि समुदाय स्तरावर नियमित आरोग्य (पान 2 वर..)

'पावसाळ्यापूर्वी नाल्यांची सर्व कामे पूर्ण करा; नागरिकांना त्रास होऊ देणार नाही'- महापौर कोंड्याल

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरात पाणी तुंबण्याच्या समस्या उद्भवू नयेत तसेच नाल्यांमधील पाण्याचा सुरळीत प्रवाह कायम राहावा यासाठी सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने शहरातील विविध नाल्यांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. ही पाहणी महापौर श्री विनायक कोंड्याल यांच्या नेतृत्वाखाली पार पडली.

यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त सोनाली यादव, नगर अभियंता सारिका अक्कूलवार यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच संबंधित विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि त्या त्या प्रभागातील नगरसेवक व नगरसेविका उपस्थित होते.

या पाहणी दौऱ्यात जुना पूना नाका येथील नाला, बाळे परिसरातील वैष्णवी हाइट्स,

उमानगर येथील शरदचंद्र पवार शाळेजवळील नाला, स्पर्श हॉस्पिटल परिसर, गुलमोहर अपार्टमेंट, ६ कमान, १४ कमान, यश नगर तसेच ५४ मीटर रस्ता परिसरातील नाल्यांची सविस्तर पाहणी करण्यात आली.

यावेळी नाल्यांची स्वच्छता, पाण्याचा प्रवाह, अतिक्रमणे, गाळ साचलेली ठिकाणे तसेच पाण्याचा निचरा सुरळीत होत आहे का याची माहिती अधिकाऱ्यांकडून घेण्यात आली. महापौर श्री विनायक कोंड्याल यांनी अनेक ठिकाणी नाल्यांचे खोलीकरण आणि रुंदीकरण करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच नाल्यामध्ये मिश्रित होणारे सांडपाणी अथवा अन्य पाण्याचे स्रोत याबाबत सखोल चौकशी करून आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आदेशही देण्यात आले.

पाहणीदरम्यान काही ठिकाणी नाल्यांच्या प्रवाहात अडथळा निर्माण करणारे छोटे पूल आणि इतर अडथळे आढळून आले. त्याबाबत महापौरांनी संबंधित विभागांना तात्काळ आवश्यक कार्यवाही करून अडथळे दूर करण्याच्या सूचना दिल्या. पावसाळ्यापूर्वी सर्व नाल्यांची स्वच्छता, दुरुस्ती तसेच खोलीकरण आणि रुंदीकरणाची कामे पूर्ण करण्यात यावीत, असे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

यावेळी महापौर श्री विनायक कोंड्याल म्हणाले, 'पावसाळ्यात नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये, शहरात पाणी साचू नये आणि नाल्यांमधील पाण्याचा निचरा सुरळीत राहावा यासाठी महानगरपालिका प्रशासन पूर्णपणे सज्ज आहे. शहरातील सर्व प्रमुख नाल्यांची नियमित स्वच्छता, पाहणी आणि आवश्यक दुरुस्तीची कामे वेगाने सुरू आहेत. ज्या ठिकाणी अडथळे किंवा समस्या आढळतील त्या तत्काळ सोडवण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत.'

या पाहणी मोहिमेमुळे शहरातील नाला स्वच्छता आणि पावसाळी पूर्वतयारीच्या कामांना अधिक गती मिळणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

महाविकास आघाडी विधान परिषदेच्या सर्व जागा लढवणार

मुंबई (कटूसत्य वृत्त):- विधान परिषदेच्या 17 जागांसाठी महायुतीत रस्सीखेच सुरू असतानाच महाविकास आघाडीनेही आता या निवडणुकीसाठी कंबर कसल्याचं दिसून येतंय. महाविकास आघाडी विधान परिषदेच्या सर्व म्हणजे 17 जागा लढवणार आहे.

त्यामध्ये काँग्रेस सर्वाधिक जागा लढवणार असून त्याखालोखाल ठाकरेंची शिवसेना आणि शरद पवारांची राष्ट्रवादी जागा लढवणार आहे. येत्या 18 जून रोजी विधान परिषदेच्या 17 जागांसाठी निवडणूक पार पडणार आहे.

या 17 जागांपैकी काँग्रेस सात ते आठ जागा लढणार आहे. तर ठाकरेंची शिवसेना पाच ते सहा जागा लढणार आहे. त्याचवेळी शरद पवारांची राष्ट्रवादी तीन ते चार जागावर लढणार असल्याची माहिती आहे.कोण कुठल्या जागांवर लढणार याविषयीचा निर्णय येत्या दोन ते तीन दिवसांत घेतला जाणार असल्याची माहिती आहे. 26 तारखेला मविआ नेत्यांची पुन्हा बैठक होणार असून त्यावेळी अंतिम चित्र स्पष्ट होईल.

दरम्यान, महायुतीतल्या

नाराजीचा फायदा उठविण्याचा महाविकास आघाडीचा प्रयत्न आहे. त्यामुळे महाविकास आघाडीकडून सर्व जागा लढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

कोणत्या जागेवर कुणाचा दावा?

विधान परिषदेच्या 17 जागांसाठी महाविकास आघाडीचा जागावाटपाचा फॉर्म्युला अद्याप निश्चित झाला नसला तरी ज्या ठिकाणी ज्या पक्षाची ताकद आहे तो ती लढवेल अशी माहिती आहे. त्यानुसार चंद्रपूर, सांगली-सातारा या ठिकाणी काँग्रेसची ताकद आहे. तर परभणी हिंगोलीमध्ये शिवसेनेची ताकद आहे. त्यानुसार जागावाटप होणार असल्याची माहिती आहे.

महायुतीच्या नेत्यांची दिल्ली वारी

2022 मध्ये भाजपसोबत एकत्र येत शिंदेंनी सरकार स्थापन केलं.. पुढे 2023 मध्ये अजित पवारांची राष्ट्रवादीही या सरकारमध्ये सामील झाली. त्यानंतर 2024 च्या विधानसभा निवडणुकीत या महायुतीला प्रचंड बहुमतही मिळालं. मात्र, निवडणूक कोणतीही असो या महायुतीतील तिन्ही पक्षांमध्ये जागावाटपासाठी होणारी रस्सीखेच आणि त्यानंतर होणारी दिल्लीवारी हे समीकरण पक्कं झालं.

आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विधान परिषदेच्या 17 जागांसाठी निवडणूक होत आहे. या निवडणुकीतील जागावाटपावरुन महायुतीत जोरदार रस्सीखेच सुरू आहे. त्यामुळे या जागावाटपाचा तिढा ही आता दिल्ली दरबारी गेला आहे. विधान परिषदेच्या जागांवर तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री दिल्लीत दाखल झाले आहेत. यासोबतच मंत्री छगन भुजबळ, गिरीश महाजन, दादा भुसे, राधाकृष्ण विखे पाटील, जयकुमार रावल असे काही मोजके मंत्रीही दिल्लीत दाखल होणार आहेत. महायुतीचे तिन्ही नेते अमित शाहांना भेटून जागावाटपाचा तिढा सोडवणार असल्याचं कळतंय.

संपादकीय

लोकशाहीची बदलती दिशा

सोशल मीडिया, तरुणांचा वाढता असंतोष आणि पारंपरिक राजकीय पक्षांविषयी निर्माण होणारी नाराजी यामुळे नव्या प्रकारच्या राजकीय चळवळी पुढे येत आहेत. सोशल मीडियावर उदयास आलेल्या 'सीजेपी'सारख्या मोहिमा या बदलत्या लोकशाहीचे महत्त्वाचे संकेत मानले जात आहेत.

जगातील लोकशाही व्यवस्थेमध्ये सध्या एक महत्त्वपूर्ण बदल घडताना दिसत आहे. अनेक वर्षे अजेय मानले गेलेले नेते अचानक पराभूत होत आहेत, पारंपरिक राजकीय पक्षांवरील जनतेचा विश्वास डळमळीत होत आहे आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून नव्या प्रकारच्या राजकीय चळवळी जन्म घेत आहेत. हंगेरीतील अलीकडील निवडणूक हा या बदलाचा अत्यंत महत्त्वाचा नमुना ठरला आहे. जवळपास सोळा वर्षे सत्तेत राहिलेल्या व्हिक्टर ओर्बन यांना जनतेने सत्तेबाहेरचा रस्ता दाखवला. ही केवळ एका नेत्याची निवडणूक हार नव्हती, तर आक्रमक राष्ट्रवाद, केंद्रीकृत सत्ता आणि प्रचारकेंद्रित राजकारणाच्या एका संपूर्ण मॉडेलला मिळालेला धक्का होता. व्हिक्टर ओर्बन हे फक्त हंगेरीचे पंतप्रधान नव्हते, ते जगभरात वाढत चाललेल्या उजव्या राष्ट्रवादी राजकारणाचे प्रतीक बनले होते. लोकशाहीच्या चौकटीत राहून लोकशाही संस्थांना कमकुवत करणे, प्रसारमाध्यमांवर नियंत्रण ठेवणे, न्यायव्यवस्थेवर प्रभाव निर्माण करणे आणि विरोधकांना राष्ट्रविरोधी ठरवणे, या पद्धती त्यांच्या राजकारणाचा केंद्रबिंदू होत्या. अनेक वर्षे त्यांनी या मॉडेलच्या आधारावर सत्ता टिकवली; परंतु अखेरीस जनतेनेच त्यांच्या विरोधात कौल दिला. यावरून हे स्पष्ट होते की, कितीही मजबूत प्रचार यंत्रणा असली, तरी जनतेचा विश्वास गमावला की, सत्ता डळमळू लागते.

हंगेरीतील हा बदल फक्त युरोपपुरता मर्यादित नाही. त्याचे प्रतिबिंब अनेक लोकशाही व्यवस्थांमध्ये दिसत आहे. भारतातही गेल्या काही वर्षांत राजकारणाचा चेहरा झपाट्याने बदलला आहे. पूर्वी आंदोलन म्हणजे रस्त्यावरचे मोर्चे, सभा, निदर्शने आणि जनसंपर्क असे मानले जात होते. आज मात्र मोबाईल स्क्रीन हेच नवे राजकीय रणांगण बनले आहे. सोशल मीडियावरील ट्रेंड, व्हायरल व्हिडीओ किंवा एखादी डिजिटल मोहीम सरकारलाही अस्वस्थ करू शकते.

याच पार्श्वभूमीवर 'कॉक्रोच जनता पार्टी' किंवा 'सीजेपी'सारखी संकल्पना समोर आली. हा पारंपरिक अर्थाने राजकीय पक्ष नाही. त्याचे भक्कम संघटन नाही, निवडणूक यंत्रणा नाही, मोठे नेते नाहीत, तरीही सोशल मीडियावर त्याची चर्चा मोठ्या प्रमाणावर झाली. बेरोजगारी आणि तरुणांच्या असंतोषाच्या मुद्द्यावर सुरू झालेल्या या व्यंगात्मक मोहिमेने अनेकांना आकर्षित केले. यावरून एक गोष्ट स्पष्ट झाली. आजच्या काळात राजकारणासाठी डिजिटल प्रभावही महत्त्वाचा आहे. भारतातील तरुणांमध्ये वाढती बेरोजगारी, परीक्षा घोटाळे, भरती प्रक्रियेत होणारा विलंब आणि आर्थिक असुरक्षितता यामुळे तीव्र अस्वस्थता निर्माण झाली आहे. नीट-यूजी पेपर लीक प्रकरणानंतर विद्यार्थ्यांचा रोष उघडपणे समोर आला. अनेक तरुणांना असे वाटू लागले आहे की, त्यांच्या समस्या कुणी गंभीरतेने ऐकत नाही. विरोधी पक्ष सरकारविरोधातील असंतोषाला संघटित राजकीय चळवळीत रूपांतरित करण्यात अपयशी ठरत आहेत. अशा स्थितीत सोशल मीडिया हे असंतोष व्यक्त करण्याचे नवे माध्यम बनते. यामध्ये एक महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, सोशल मीडियावरील लोकप्रियता आणि निवडणुकीतील विजय हे एकसारखे नसतात. लाखो फॉलोअर्स, व्हायरल पोस्ट किंवा ट्रेंडिंग हॅशटॅग हे प्रत्यक्ष मतदानात बदलतीलच असे नाही. निवडणुका जिंकण्यासाठी आजही कार्यकर्ते, बूथ व्यवस्थापन, सामाजिक समीकरणे आणि मजबूत संघटन महत्त्वाचे असते. त्यामुळे सोशल मीडिया आधारित चळवळी लगेच सत्तांतर घडवतील असे मानणे चुकीचे ठरेल; परंतु या मोहिमा वातावरण निर्माण करतात, सत्ताधाऱ्यांच्या आत्मविश्वासावर परिणाम करतात आणि लोकांच्या मनातील नाराजीला दिशा देतात.

भारतीय राजकारणात अशा घटना नवीन नाहीत. 2011 मधील 'इंडिया अगेंस्ट करप्शन' आंदोलन हे त्याचे मोठे उदाहरण आहे. भ्रष्टाचाराविरोधातील जनतेच्या असंतोषाला सोशल मीडियाने राष्ट्रीय स्वरूप दिले. त्यातून पुढे आम आदमी पक्षाचा जन्म झाला आणि त्याचा राजकीय परिणाम संपूर्ण देशाने पाहिला. आज 'सीजेपी' सारख्या मोहिमांबाबतही अशीच चर्चा सुरू आहे. काही लोक त्यामागे विरोधी पक्ष असल्याचा आरोप करतात. परंतु खरा प्रश्न हा नाही की, हे कोण चालवत आहे, तर प्रश्न असा आहे की, समाजात अशी अस्वस्थता का निर्माण होत आहे की, लोक पारंपरिक राजकारणापासून दूर जाऊन नव्या प्रतीकांना स्वीकारू लागतात? या सगळ्यामागे राजकीय प्रतिनिधित्वाचा गंभीर प्रश्न दडलेला आहे. मोठ्या प्रमाणावर तरुणांना असे वाटते की, त्यांच्या प्रश्नांवर गंभीर चर्चा होत नाही. रोजगार, शिक्षण, महागाई, परीक्षा प्रणाली आणि आर्थिक भविष्य या विषयांवर ठोस धोरणांपेक्षा प्रचाराला जास्त महत्त्व दिले जात आहे. त्यामुळे सोशल मीडिया केवळ मनोरंजनाचे साधन न राहता लोकशाहीतील पर्यायी सार्वजनिक व्यासपीठ बनत आहे.

हंगेरीतील निवडणुकीने हेच दाखवून दिले. ओर्बन यांच्याकडे मजबूत प्रचार यंत्रणा, राष्ट्रवादाचा प्रभावी मुद्दा आणि मोठे राजकीय समर्थन होते, तरीही जनतेमधील आर्थिक असंतोष, संस्थांवरील कमी होत चाललेला विश्वास आणि दीर्घकाळ सत्तेत राहिल्याने निर्माण झालेला थकवा अखेरीस निर्णायक ठरला. लोकशाहीत अंतिम निर्णय जनता घेते आणि कोणतीही सत्ता कायमस्वरूपी अजेय नसते, हा धडा या निवडणुकीतून जगाला मिळाला. भारत आणि हंगेरीची राजकीय परिस्थिती पूर्णपणे सारखी नाही. भारताची सामाजिक रचना, लोकसंख्या, विविधता आणि निवडणूक व्यवस्था वेगळी आहे, तरीही काही साम्यस्थळे दिसतात. सत्तेचे केंद्रीकरण, राष्ट्रवादावर आधारित राजकीय संवाद, कमकुवत होत चाललेला विरोधकांचा प्रभाव आणि सोशल मीडियाचे वाढते महत्त्व. आगामी काळात भारतातील राजकारण अधिकाधिक 'नॅरेटिव्ह' म्हणजेच जनमताच्या युद्धावर आधारित असेल. कोण तरुणांच्या असंतोषाला योग्य दिशा देऊ शकतो, कोण जनतेच्या प्रश्नांना खऱ्याअर्थाने आवाज देऊ शकतो आणि कोण सोशल मीडियाच्या प्रभावाला संघटित राजकीय शक्तीत बदलू शकतो यावर भविष्यातील राजकारण ठरेल. 'कॉक्रोच जनता पार्टी'सारख्या मोहिमा कदाचित काही काळानंतर नाहीशा होतील किंवा एखाद्या मोठ्या राजकीय चळवळीचे रूप घेतील; पण त्यांनी एक गोष्ट निश्चित दाखवून दिली आहे. राजकारण फक्त संसद, सभागृह किंवा रस्त्यांपुरते मर्यादित राहिलेले नाही. आजचा सर्वात प्रभावी राजकीय मंच म्हणजे सोशल मीडिया आणि मोबाइल स्क्रीन. आधुनिक लोकशाहीतील ही नवी वास्तवता आहे आणि भविष्यातील प्रत्येक राजकीय पक्षाला तिचा गंभीरपणे विचार करावा लागणार आहे.

पान १ वरून

मुलांमधील मधुमेहाचे लवकर...

तपासणी करण्याची योजना आखण्यात आली आहे.सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेसमोर बालमधुमेह हा चिंतेचा विषय बनत असल्याने केंद्र सरकारने प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक उपाययोजना अधिक प्रभावी करण्याचा निर्णय घेतला आहे. या मार्गदर्शक तत्त्वांनुसार मुलांमध्ये वेळेत तपासणी करून मधुमेहाचे निदान करणे, आवश्यक उपचार उपलब्ध करून देणे आणि सातत्याने देखरेख ठेवणे यावर भर दिला जाणार आहे.सरकारच्या या उपक्रमामुळे ग्रामीण आणि शहरी भागातील मुलांना समान पातळीवर आरोग्य सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार असून, बालमधुमेहामुळे उद्भवणाऱ्या गंभीर गुंतागुंती टाळण्यासही हातभार लागणार आहे.

सरकारच्या चुकीच्या धोरणाला कॉकरोच डंक मारणार का?

आता कॉकरोचचे वादळ थांबायचे नाय! देश विकासाच्या प्रगतीचे पथावर आहे ही बाब सत्य आहे,तरीही देशात बेरोजगारी, कुपोषण, भुकमरी, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां, बेरोजगारांच्या समस्या,शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार आणि इतर क्षेत्रातील भ्रष्टाचार या सारख्या गंभीर समस्या आजही देशात घर करून बसल्या आहेत.कारण वाढल्या भ्रष्टाचाराने देशाला पोखरून टाकले आहे. वाढती बेरोजगारी व महागाईचा कळस यात बेरोजगार तरूण भरडल्या जात आहे आणि आता बेरोजगारांची तुलना कॉकरोच सोबत करून बेरोजगारांच्या जखमेवर मीठ चोळन्याचे काम सरन्यायाधीशांनी केले.त्यामुळे याचे पडसाद संपूर्ण देशभर व देशाच्या बाहेर सुद्धा उमटतांना दिसत आहे. आज देशातील वाढत्या बेरोजगारीमुळे युवा वर्ग त्रस्त आहे आणि यात महागाईने मोठी भर टाकुन देशाच्या युवावगासीबतच देशाच्या १४० कोटी जनतेला व्दीधेमध्ये टाकले. सरकारने स्वतःच्या स्वाथार्साठी अनेक मोफत सुविधा अंमलात आणुन आम जनतेच्या खिशाला मोठी कात्री लावली आहे व देशाची अर्थव्यवस्था चौपट झाल्याचे दिसून येते.यामुळे देशात शेतकरी वर्ग, बेरोजगार युवक, आम जनता अत्यंत त्रस्त आहे.कारण सरकारने लावलेली मोफत सुविधा याची संपूर्ण झळ महागाईच्या रूपात देशाच्या गरीब भोळ्याभाबड्या जनतेला भोगावी लागते आहे.मुख्य न्यायाधीश सूर्यकांत यांनी एका सुनावणी दरम्यान देशातील बेरोजगार तरूणांना झुरळ (कॉकरोच) म्हटले.ते म्हणाले की, काही बेरोजगार तरूण झुरळांसारखे (कॉकरोच सारखे) असतात, जे नंतर मीडिया, सोशल मीडिया किंवा आरटीआय कार्यकर्ते बनून व्यवस्थापनेवर हल्ला करू लागतात.या त्यांच्या वक्तव्याने देशातच नाही तर संपूर्ण जगभरात सोशल मीडियाच्या माध्यमातून खळबळ उडाली. शेवटी सरन्यायाधीशांनी म्हटले की, माज्या वक्तव्याचा विपर्यास लावला.ही बाब आम्हीही समजु शकतो किंवा सत्य राहु शकते यात दुमत नाही.परंतु झुरळ (कॉकरोच) या शब्दने देशातील संपूर्ण बेरोजगार तरूणांनवर एवढा मोठा घाव केला की,तो भरून निघने शक्य नाही.कारण देशात आपण ताजे नीट पेपर लिक प्रकरण पहाले यात २५ हजार युवकांना त्याची झळ सोसावी लागत आहे व त्यांची मनःस्थिती विस्कळीत झाली आहे आणि चार ते पाच युवकांनी या प्रकरणाला कंटाळून आत्महत्या सुध्दा केल्याचे दिसून येते.म्हणजे तरूणांच्या डोळ्यासमोर शिक्षण प्रणालीची खुली हत्या होत आहे, त्याचप्रमाणे शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात लुट आताही सुरूच आहे, देशात करोडोंचे प्रोजेक्ट आल्याचे मिडियाच्या माध्यमातून सरकार कडून सांगितले जाते परंतु बेरोजगारांना अजुनही रोजगार उपलब्ध झालेला नाही, आज देशातील प्रत्येक जिल्ह्यातील किंवा शहरातील युवकांना त्यांच्या स्थानिक ठिकाणी रोजगार उपलब्ध नसल्याने आपला परिवार सोडून मुंबई, बंगलोर, पुणे, हैदराबाद, अहमदाबाद इत्यादी अनेक ठरावीक ठिकाणी रोजगारासाठी युवा वर्ग जातांना दिसतो.परंतु देशातील अनेक राज्यात स्थानिक पातळीवर पाहिजे त्याप्रमाणात रोजगार सरकार उपलब्ध करून देवू शकली नाही ही देशाची शोकांतिका आहे.त्यामुळे काही युवावर्ग पुणे, मुंबई, हैदराबाद, बंगलोर, अहमदाबाद अशा नामांकित ठीकाणी धाव घेतांना दिसतात.अशा ठिकाणी त्यांना रोजगार मिळाला तर ठीक आहे अन्यथा हताश होऊन आत्महत्या होतांना सुध्दा आपण पहिले आहे. अशा परिस्थितीत देशाचे उच्च पदस्थ अधिकारी बेरोजगारांची तुलना "कॉकरोच"सोबत करीत असेल तर हे स्वतंत्र भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल. सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी १५ मे २०२६ रोजी सर्वोच्च न्यायालयात एका खटल्याची सुनावणी करताना बेरोजगार तरुणांची तुलना झुरळांशी (कॉक्रोच) केली होती. वरिष्ठ वकील दर्जा मिळवण्याच्या याचिकेवर सुनावणी सुरू असताना, "काही बेरोजगार तरुण झुरळांसारखे असतात, जे नंतर मीडिया, सोशल मीडिया किंवा आरटीआय कार्यकर्ते बनून व्यवस्थेवर हल्ला करू लागतात," असे ते म्हणाले होते. या वक्तव्यामुळेच देशभरात मोठे वादळ निर्माण झाले. यावर प्रतिक्रिया उमटत असताना, सरन्यायाधीशांनी नंतर स्पष्टीकरण दिले की, त्यांचे हे वक्तव्य भारतातील सर्वसामान्य तरुणांविषयी नसून, बनावट पदव्या असलेल्या आणि समाजमाध्यमांवरून विनाकारण यंत्रणेला लक्ष्य करणाऱ्या विशिष्ट घटकाबाबत होते. हीबाब ठीक आहे व सत्य राहु शकते.परंतु कॉकरोच या शब्दरचनेमुळे युवकांमध्ये एक जागृता निर्माण झाली आहे आणि कॉकरोचचा झुंड (युवावर्ग) एकत्र झाला तर सरकारची मनमानी आणि भ्रष्टाचार बंद झाल्याशिवाय रहाणार नाही. आज देशाच्या प्रत्येक बेरोजगार तरूणांच्या मनात राजकीय पुढाऱ्यांन विषयीं व्देशभावना दिसून येते कारण आजी-माजी लोकप्रतिनिधी-जनप्रतिनिधी यांचे वेतन, भत्ते, पेंशन, गाडी, बंगला, मोठ्या प्रमाणात करोडों रूपयांची चलअचल संपत्ती ही बाब नेहमी काळजात खुपत असते.कारण हे लोकप्रतिनिधी पाच वर्षात करोडपती होतात. लोकप्रतिनिधी-जनप्रतिनिधी हा देशाची जनतेची सेवा करण्यासाठी निवडून दिलेला प्रतिनिधि असतो.परंतु देशसेवा व जनसेवेला पाठ दाखवून स्वतःच्या सेवेत जास्त मग्न असतो आणि तेथुनच भ्रष्टाचाराचा उगम होतो. आज याच राजकीय पुढाऱ्यांमुळे देशाच्या सरकारी शाळा बंद होण्याच्या मार्गावर आहेत.कारण याच राजकीय पुढाऱ्यांनी आपली मोठमोठी शाळा-महाविद्यालये खोलुन व्यवसाय थाटला आहे आणि आपल्या मुलांना शिक्षणासाठी विदेशात पाठवितात.यावरून स्पष्ट होते की, देशाच्या राजकीय पुढाऱ्यांनी स्वतःच्या स्वाथार्साठी देशाच्या शिक्षण व्यवस्थेला पोखरून टाकले आहे. त्यामुळे खरोखरच देशाला कॉकरोचची गरज आहे असे मला वाटते. कदाचित सरन्यायाधीशांना वाटले असावे की, युवा क्रांती व्हावी आणि तोच शब्द त्यांच्या तोंडून निघावा ही एक बेरोजगार तरूणांनसाठी टर्निंग पॉईंट असु शकतो आणि आता खरोखरच देशातील युवा बेरोजगार वर्ग एकत्र येण्याची खरी वेळ आली आहे. अमेरिका-इजरायल-इराण युध्दाला सुरुवात २८ फेब्रुवारी २०२६ ला सुरूवात झाली आणि या काळात देशातील पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका सुध्दा झाल्यात,मंत्री, प्रधानमंत्री,राज्यांचे मुख्यमंत्री,विरोधी पक्ष नेते इत्यादी संपुर्ण राजकीय फौजफाटा पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीमध्ये दोन महिने प्रचारात व्यस्त होता.या काळात करोडो लिटर पेट्रोल-डिझेलचा वापर झाला आणि मोठ्या देशाचा पैसा खर्च झाला तेव्हा पेट्रोल-डिझेल भाव एक पैसाही वाढला नाही व अर्थव्यवस्थेवर काहीच झळ पोहोचली नाही आणि आता युद्ध थांबता बरोबर व विधानसभा निवडणुका संपल्या बरोबर पेट्रोल-डिझेलचे भाव दहा दिवसांत चार वेळा वाढविण्यात आले हि गंभीर बाब आहे.कारण पेट्रोल -डिझेलमुळे सरकारला ७७ हजार कोटींचा नफा असुनही पेट्रोल-डिझेलचे चौथ्यांदा भाव वाढने ही देशासाठी धोक्याची घंटा आहे आणि सरकार सांगते की,देशाची अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी आपण हे भाववाढ करीत असल्याचे सरकार मार्फत सांगितले जात आहे.सरकार भाव वाढीचे कारण आंतरराष्ट्रीय आयात-निर्यातचे कारण सांगत आहेत.ही तर देशाची व देशाच्या युवावर्गाची फसवेगिरीच म्हणावी लागेल. सरकार खोटी आश्वासने देऊन बेरोजगार तरूणांनच्या जखमेवर मीठ चोळन्याचे काम करीत आहेत.त्यामुळे कॉकरोच आता सरकारला सुखाची झोप कदापि घेऊ देणार नाही. कारण आज कॉकरोच सोबत, शेतकरी वर्ग, देशातील सर्वसामान्य वर्ग, कामगार वर्ग, मजुर वर्ग एकत्र येत आहे. त्यामुळे आता सरकारला युवा बेरोजगारांना न्याय द्यावाच लागेल अन्यथा कॉकरोच (झुरळ) त्यांचे सर्वांचे गड उध्दवस्त करतील. कॉकरोच या विधानानंतर सोशल मीडियावर 'कॉक्रोच जनता पार्टी' नावाची एक ऑनलाइन चळवळही सुरू झाली आहे आणि याला करोडो फालोअर आपली पसंती दाखवीत आहे.कारण सरन्यायाधीश सूर्यकांत म्हणतात की,"काही बेरोजगार तरुण झुरळांसारखे (कॉकरोच सारखे) असतात.हे सरन्यायाधीशांचे वक्तव्य देशाच्या बेरोजगार तरूणांच्या जिव्हारी लागले आहेत.त्यामुळे बेरोजगारांमध्ये मोठ्या प्रमाणात आक्रोश वाढला असून युवा क्रांती निर्माण होण्याची दाट शक्यता आहे.आपल्या देशात राजकीय वतुर्ळात प्रथा आहे की,पहीले काहीही बोलून देणे आणि नंतर माफी मागणे किंवा माझा तो उद्देश नव्हता असे बोलून पळवाटा काढणे तेच काम माननीय सरन्यायाधीशांनी केल्याचे दिसून येते.असो जे होते ते चांगल्यासाठीच होते आणि हा तरूणांनसाठी एक चांगला टर्निंग पॉईंट राहावा असे मला वाटते.जय हिंद.

रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

अक्कलकोट तालुका कृषी विभागाची धडक कारवाई

बोगस बियाणांच्या 480 बॅग जप्त

अक्कलकोट, (कटूसत्य वृत्त):- तालुका कृषी अधिकारी कार्यालयास रात्री ८ वाजता(दि. 26) बोगस उडीद बियाणे विक्रीची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर मोठी कारवाई करण्यात आली. स्वामी समर्थ कृषी सेवा केंद्र, शेळगांव (ता. परांडा, जि. धाराशिव) चे प्रोप्रायटर रत्न ाकर रघुनाथ कोले यांनी निर्मल सीड्स प्रा. लि. कंपनीच्या उडीद वाण ठवछ 7 (विश्वास) बॅगची हुबेहूब नक्कल करून विक्रीसाठी आणलेली ४८ बॅग तसेच आबा कृषी सेवा केंद्र, अक्कलकोट येथील गोडाऊनमध्ये ठेवलेल्या ४३२ बॅग अशा एकूण ४८० बॅग (प्रति ५ किलो) जप्त करण्यात

आल्या. या बोगस बियाण्यांची किंमत तब्बल ८,४६,७२० रुपये इतकी आहे, अशी माहिती जिल्हा परिषद कृषी विकास अधिकारी हरिदास हावळे यांनी दिली आहे.

सदर कारवाई जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सोलापूर शुक्रचार्य भोसले व कृषी विकास अधिकारी हरिदास हावळे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा स्तरीय भरारी पथकाने केली. या मोहिमेत तालुका कृषी अधिकारी अक्कलकोट श्री. चंद्रकांत मंगरुळे, मोहीम अधिकारी अजय वगरे, गुणवत्ता नियंत्रण अधिकारी बी.बी. बाबर, अशोक कांबळे तसेच निर्मल कंपनीचे जिल्हा प्रतिनिधी श्री. वासुदेव नाटीकर उपस्थित होते.

जप्त केलेल्या बोगस बियाणे विक्रेत्यावर रात्री उशिरा अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे शेकडो शेतकरी फसवणुकीपासून वाचले असून कृषी विभागाने कठोर पावले उचलल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

चर्मकार समाज विकास मंडळाच्या वतीने राज्यस्तरीय वधू-वर परिचय संमेलन

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- चर्मकार समाज विकास मंडळाच्या वतीने यंदाही समाजातील उपवर, युवक, युवती, घटस्फोटीत, विधवा आणि विधूर यांच्यासाठी राज्यस्तरीय वधू-वर परिचय संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, ३१ मे २०२६ रोजी जामगुंडी लॉन्स, आसरा चौक, जुळे सोलापूर येथे हा मोफत वधू-वर परिचय संमेलन आयोजित करण्यात आला असल्याची माहिती मुख्य निमंत्रक राजशेखर जेऊरकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यंदा राज्यस्तरीय वधू-वर परिचय संमेलनाचे दुसरे वर्ष असून आंध्र, कर्नाटकसह मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रातून वधू-वर आणि त्यांचे पालक उपस्थित राहणार आहेत.

पालक आणि इच्छुकांचे प्रबोधन करुन योग्य, अनुरूप जोडीदार लाभावा यासाठी चर्मकार समाज विकास मंडळ या संमेलनाच्या माध्यमातून प्रयत्न करीत आहे.

मागील वर्षी झालेल्या संमेलनात ९६० वधू-वर यांची नोंदणी झाली होती. या मेळाव्याला १६०० वधू वर उपस्थित राहणार आहेत. यंदाही राज्यभरातून इच्छुक उमेदवार आणि पालक येत आहे

रविवार 31 मे रोजी सदर कार्यक्रम संपन्न होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रायगड जिल्ह्याचे उपजिल्हाधिकारी भारत वाघमारे राहणार असून कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण सोलापूरचे अधीक्षक अभियंता सुनील माने यांच्या हस्ते होणार आहे.प्रमुख अतिथी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे प्रदेशाध्यक्ष माधव गायकवाड हे चर्मकार समाजाची दशा व दिशा या विषयास अनुसरून ते उपस्थित समाज बांधवांना मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमास पूर्वा भारत वाघमारे, शुभांगी सुनील माने, हरिदास टोणपे, सुभाष सावस्कर, दत्ता शिंदे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

या पत्रकार परिषदेस वधु वर परिचय संमेलन नियोजन समितीचे प्रमुख वामन धुळराव, परशुराम शिंदे, सदाशिव कांबळे,काशिनाथ वाघमारे, मल्हारी बनसोडे, दत्ता शिंदे, शिवपुत्र हरवाळकर, दत्ता हरवाळकर, अंबादास वाघमारे,संगीता शिंदे, सुनिता वनस्कर, रेवणसिद्ध व्हनमराठे, शावरप्पा वाघमारे, सुजाता हरवाळकर, राजश्री कांबळे पोर्णिमा धूळराव, इत्यादी उपस्थित होते.

उसतोड मजूर पुरवठ्याच्या नावाखाली २१.६० हजाराची फसवणूक

वैराग (कटूसत्य वृत्त):- वैराग पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या आर्थिक फसवणुकीच्या गुन्ह्यातील फरार आरोपी जयंद्र जयचंद राठोड (वय ३२, रा. अमानपूर, ता. उमरखेड, जि. यवतमाळ) याला वैराग पोलिसांनी मुंबई येथून अटक केली आहे. आरोपीने उसतोड मजूर पुरवठा करण्याच्या नावाखाली फिर्यादी विजय दिगंबर पवार यांच्याकडून तब्बल २१ लाख ६० हजार रुपये घेतले होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सन २०२५-२६ गळीत हंगामासाठी आरोपीने १८ कोयते मजूर पुरविण्याचा करार करून फिर्यादीकडून रोख व आरटीजीएसद्वारे वेळोवेळी रक्कम घेतली. मात्र कारखाना सुरू झाल्यानंतरही मजूर न पुरवता आरोपी फरार झाला. याप्रकरणी वैराग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान आरोपीचे मोबाईल बंद असल्याने पोलिसांनी यवतमाळ, भिवंडी आणि मुंबई येथे शोधमोहीम

राबवली. गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी सायन हॉस्पिटल परिसरात असल्याचे समजताच पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. चौकशीत आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली असून अधिक तपासासाठी न्यायालयाकडून २ दिवसांची पोलीस कोठडी मिळाली आहे. पोलिस तपासात आरोपीविरुद्ध यापूर्वीही फसवणुकीचे गुन्हे दाखल असल्याचे समोर आले असून, आणखी काही लोकांची फसवणूक झाली आहे का याचाही तपास सुरू आहे. सदरची कामगिरी वैराग पोलीस निरीक्षक श्री कुंदन गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार उमेश कंगले पोलीस कॉन्स्टेबल श्रीमंत शिंगाडे यांनी केली.

दत्तकला इंजिनिअरिंगचे प्रा. विजयसिंग राठोड यांना पीएच.डी. पदवी

करमाळा, (कटूसत्य वृत्त):- दत्तकला शिक्षण संस्थेच्या दत्तकला इंजिनिअरिंग महाविद्यालयातील मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाचे प्राध्यापक विजयसिंग राठोड यांना छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठामार्फत पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे.

प्रा. राठोड यांनी ह्व्हर्च्युअल डिझाईन सिस्टीम ऑफ कंपाऊंड डाय इन प्रेस वर्किंग ऑपरेशनह्व या विषयावर संशोधन पूर्ण करून शोधनिबंध सादर केला. त्यांच्या संशोधनात प्रेस वर्किंगमधील कंपाऊंड डाय डिझाईन प्रक्रिया अधिक कार्यक्षम, अचूक व वेळेची बचत करणारी करण्यावर भर देण्यात आला असून हे संशोधन औद्योगिक क्षेत्रासाठी उपयुक्त मानले जात आहे.

या संशोधनासाठी त्यांना डॉ. रविकुमार संगेवार व डॉ. नंदकिशोर सवई यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या

यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रा. रामदास झोळ, सचिवा माया झोळ यांनी सत्कार करून अभिनंदन केले. यावेळी डॉ. विशाल बाबर, प्रा. श्रीकांत साळुंके, डॉ. संभाजी पाटील तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

प्रा. राठोड यांच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील कायार्ला नवी उंची मिळाल्याची भावना मान्यवरांनी व्यक्त केली. तसेच विद्यार्थ्यांसाठीही हे यश प्रेरणादायी ठरत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

खा प्रणिती शिंदे यांचे ग्रामस्थांच्या प्रश्नांवर तात्काळ कार्यवाहीचे आश्वासन

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी गावभेट दौऱ्याअंतर्गत पडसाळी व वांगी या गावांना भेट देत ग्रामस्थांच्या समस्या जाणून घेतल्या तसेच प्रलंबित विकासकामे तातडीने मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.

पडसाळी गावात सोयाबीन पीक विमा तसेच शिरापूर उपसा सिंचन योजनेचे पाणी गावात लवकर सुरू करण्याबाबत ग्रामस्थांनी खासदार प्रणिती शिंदे यांच्यासमोर मागणी मांडली.

यावेळी त्यांनी जागेवरूनच शिरापूर उपसा सिंचन योजनेच्या अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवर संपर्क साधून कामातील विलंबाबाबत जाब विचारला. तसेच पडसाळी गावातील एसटी बसचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केल्याचे सांगत गावात एमपीएससी - यूपीएससी स्पर्धा परीक्षांसाठी अभ्यासिका उभारून देण्याचे आश्वासनही दिले.

त्यानंतर वांगी गावात झालेल्या बैठकीत गावाला जोडणाऱ्या सर्व प्रमुख रस्त्यांची दुरुस्ती, वांगी-कळमण पुलाची उंची वाढविणे तसेच अतिरिक्त डेपोच्या प्रश्नावर ग्रामस्थांनी लक्ष वेधले.

यावेळी खासदार प्रणिती शिंदे यांनी गावातील सर्व प्रलंबित मागण्या आणि विकासकामे लवकर पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले.

दौऱ्यादरम्यान खासदार प्रणिती शिंदे यांनी स्थानिक नागरिकांशी थेट संवाद साधत त्यांच्या समस्या, सूचना आणि विकासाच्या अपेक्षा जाणून घेतल्या. गावांमध्ये प्रलंबित असलेली विकासकामे अधिक गतीने आणि परिणामकारकपणे पूर्ण करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

यावेळी उत्तर सोलापूर तालुका अध्यक्ष भारत जाधव, सचिन गुंड, कृष्णात पाटील, अंबादास पाटील, विलास पाटील, बापूसाहेब बंडगर, चांगदेव गवळी, यल्लप्पा पवार, आप्पासाहेब वडणे, ज्योतिराम पाटील, सतीश भोसले, अमर शेख, रामचंद्र शिरसाट, अमर भोसले, ज्ञानेश्वर भोसले, संदीप सुरवसे, शुभम शिराळ यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, ग्रामपंचायतचे सरपंच, उपसरपंच, सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वात्रटिका

कांदा आणि वांदा

प्रश्न कांद्याचा आहे
तो तर मिटला पाहिजे...
इथं मिटणार नाही त्यासाठी
दिल्ली दौरा थाटला पाहिजे...
कांद्या आडून जागा वाटपाचा
वांदा मिटवायचा आहे...
निमित्त सांगून वारी आहे आणि
मित्राला पटवायचा आहे...

हणमंत पडवळ,
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादक: श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालय: एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादक: पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादक: सचिन मोहन जाध

कार्यालयीन अधीक्षक साधना शिंदे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- मध्य रेल्वे सोलापूर विभागातील वाणिज्य विभाग (वरिष्ठ डीसीएम) कार्यालयीन अधीक्षक साधना शिंदे यांचा सेवानिवृत्ती निमित्त यथोचित सत्कार करण्यात आला.

नॅशनल रेल्वे मजदूर युनियनचे महामंत्री वेणू पी नायर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी डिव्हिजनल सेक्रेटरी राजीव पुरुषोत्तम, नॅशनल रेल्वे मजदूर युनियनचे अध्यक्ष एस.एल. कांबळे, डिव्हिन कोषाध्यक्ष विजय शांती, असिस्टंट डिव्हिजनल सेक्रेटरी अतुल सावंत, ईसीसी बँकेचे संचालक माणिकराव यमगार, ओपन लाईन सेक्रेटरी रियाज शेख, वर्किंग कमिटी मेंबर संतोष वाघमारे, हेडक्वार्टर वर्किंग कमिटी मेंबर वर्षा चांडक, एलटीआरएस चेअरमन संजय पवार, ईसीसी बँकेचे माजी अध्यक्ष करुणा गायकवाड, कमर्शियल डिपार्टमेंटचे कल्पना बनसोडे, महबूब शेख, रफिक शेख, स्वप्नील शिवशरण, मनोज वाल्मिकी, ए.के यादव यांच्यासह युनियन पदाधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यालयीन अधिक्षक साधना शिंदे यांनी आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात कर्तव्यनिष्ठा, प्रामाणिकपणा आदर्श निर्माण केला आहे. त्यांचे कार्य हे कर्मचाऱ्यांसाठी प्रेरणादायी आहे. सेवानिवृत्ती हा शेवट नसून आयुष्याच्या नव्या आनंददायी पवार्ची सुरुवात आहे. संस्थेसाठी दिलेले त्यांचे योगदान सदैव स्मरणात राहील, अशा शब्दात मान्यवरांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी रेल्वे विभागातील कर्मचारी, अधिकारी तसेच नातेवाईक आणि मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

राज्यस्तरीय महिला खो-खो, कबड्डी स्पर्धेचे आयोजन

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- हिंदू धर्मरक्षिणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने सोलापूर जिल्हा कबड्डी असोसिएशन आणि उत्कर्ष क्रीडा मंडळ यांच्या सहकार्याने सोलापुरात राज्यस्तरीय महिला खो-खो आणि कबड्डी स्पर्धेचे आयोजन दि. 28 ते 30 मे 2026 दरम्यान सोलापुरातील नॉर्थकोट प्रशाला मैदानावर करण्यात आले आहे, अशी माहिती महामंडळाचे ट्रस्टी अध्यक्ष जयवंत सलगर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या कबड्डी व खो-खो राज्यस्तरीय क्रीडा स्पधेर्साठी प्रत्येकी आठ संघ सहभागी होणार आहेत तसेच दोन्ही स्पर्धांचे मिळून सुमारे 300 खेळाडू उपस्थित राहणार आहेत. कबड्डी स्पर्धा या सायंकाळच्या सत्रात होतील तर सकाळ व संध्याकाळच्या सत्रात खो-खोचे सामने होणार आहेत. या दोन्ही स्पधेर्साठी प्रत्येकी प्रथम क्रमांक 51 हजार रुपये, स्मृती चषक, द्वितीय क्रमांक 31 हजार रुपये, स्मृती चषक आणि तृतीय क्रमांकासाठी 15 हजार रुपये व स्मृती चषक असे बक्षिसाचे स्वरूप आहे. प्रत्येक स्पर्धेसाठी तीन वैयक्तिक पारितोषिके ठेवण्यात आली आहेत.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र विधानसभेचे सभापती राम शिंदे, पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे, जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, महापौर विनायक कोंड्याल आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. या स्पर्धांमध्ये आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय खेळाडूंचा सहभाग राहणार आहे. या स्पर्धेचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन ट्रस्टी अध्यक्ष जयवंत सलगर आणि उत्सव अध्यक्ष विकी डोबांळे यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेस नागेश खरात, अक्षय वाकसे, सचिन हक्के, शंकर नरोटे, अतुल माशाळ, समर्थ मोटे आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्र गोजातीय प्रजनन अधिनियमाची कडक अंमलबजावणी

अनधिकृत कृत्रिम रेतन केंद्रांवर कारवाईचे निर्देश

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- राज्यातील गाई-म्हशींच्या जातींमध्ये सुधारणा करून प्रजनन प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यासाठी महाराष्ट्र शासनाने लागू केलेल्या 'महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) अधिनियम, २०२३' ची प्रभावी अंमलबजावणी सुरू झाली आहे. अद्याप नोंदणी न केलेल्या खाजगी कृत्रिम रेतन सेवा पुरवठादार व संस्थांवर नियमोचित कारवाई करण्याचे निर्देश पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांनी दिले आहेत.

या अधिनियमाची अंमलबजावणी ५ डिसेंबर २०२४ पासून सुरू झाली असून, उत्तम दर्जाच्या व उच्च वंशावळीच्या वळूंच्या माध्यमातून कृत्रिम रेतन करून दुधाळ जनावरांची पैदास वाढवणे तसेच प्रजनन प्रक्रियेमधील गैरप्रकारांना आळा घालणे हा मुख्य उद्देश आहे.

नोंदणी बंधनकारक

राज्यातील सर्व रेत केंद्रे, भ्रूण प्रत्यारोपण केंद्रे, कृत्रिम रेतन प्रशिक्षण संस्था आणि सेवा पुरवठादार यांनी 'महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण' यांच्याकडे नोंदणी करणे बंधनकारक आहे. नोंदणीकृत संस्थांना केवळ प्रमाणित व उच्च वंशावळीच्या वळूंचेच रेत वापरण्याची परवानगी असेल.

दंड व शिक्षेच्या तरतुदी

- कलम ४ व ५ अन्वये नोंदणी प्रमाणपत्रधारकाने मानकांचे पालन न केल्यास रु. ५० हजारांपर्यंत दंड.
- नोंदणी प्रमाणपत्राविना प्रजनन क्रिया अथवा अप्रमाणित वळूंपासून रेत उत्पादन केल्यास रु. १ लाखांपर्यंत दंड.
- चुकीची अथवा दिशाभूल करणारी जाहिरात केल्यास सहा महिन्यांपर्यंत कारावास किंवा रु. २ लाखांपर्यंत दंड अथवा दोन्ही शिक्षा.

शेतकऱ्यांसाठी सूचना

- फक्त प्रमाणित व अधिकृत वियार्मात्रांचा वापर करावा.
- सेवा घेण्यापूर्वी तंत्रज्ञाचा नोंदणी क्रमांक तपासावा.
- नोंदणीकृत तंत्रज्ञांकडूनच कृत्रिम रेतन सेवा घ्यावी.
- अनियमितता आढळल्यास तात्काळ तक्रार नोंदवावी.

शेतकऱ्यांना होणारे फायदे

- सुधारित व उच्च उत्पादनक्षम वंशामुळे अधिक दूध उत्पादन.
- प्रजनन कार्यक्षमतेत वाढ होऊन जनावरांची गुणवत्ता सुधारणा.
- वैज्ञानिक व नियंत्रित प्रजननामुळे दीर्घकालीन पशुधन विकास.
- दुग्ध व्यवसायात स्थैर्य व शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ.

सलगर वस्ती परिसरात तब्बल 200 झाडांची कत्तल

उपमहापौर देवकर यांच्यासह पर्यावरण प्रेमींची मागणी

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- प्रभाग क्रमांक 23 मधील सलगर वस्ती परिसरात गेल्या काही दिवसापासून सुमारे 200 झाडांची कत्तल करण्यात आली आहे. पर्यावरण प्रेमींनी या संदर्भात तक्रार केली असता एक ट्रक ताब्यात घेण्यात आला आहे. याप्रकरणी संबंधितांवर कारवाई करावी अन्यथा हरित लवादासह न्यायालयात दाद मागण्यात येईल, अशी माहिती पर्यावरणवादी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांच्यासह पर्यावरण प्रेमींनी पत्रकार परिषदेत दिली.

सलगर वस्ती परिसरात गेल्या काही दिवसांपासून वृक्षतोड करण्यात आली असल्याची माहिती आहे. आम्ही जागेवर जाऊन पाहणी केली. जागतिक पर्यावरण दिनाच्या पुवेर्संध्येलास शहरात सर्वात मोठी वृक्षतोड करण्यात आली असून यामध्ये सुमारे 200 झाडांची कत्तल करण्यात आली असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. बिल्डरांना पर्यावरण रक्षणाचे काही देणं घेणं राहिले नाही. त्यांना सिमेंटचे जंगल उभा करायचा आहे. यामुळे प्रशासनाची भीती राहिली नाही. विनापरवानगी ही वृक्षतोड करण्यात आली आहे. या वृक्षतोडीमध्ये केवळ पर्यावरणाचेच नाही तर वन्यजीवांचेही नुकसान झाले आहे. या झाडांवर खारुताईसह विविध पक्षी यासह वन्यजीवांचा रहिवास होता. त्यांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सोलापूरच्या इतिहासातील ही सर्वात मोठी वृक्षतोड झाली असल्याचा आरोप यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर आणि पर्यावरण प्रेमी मनोज देवकर यांनी केला आहे.

महापालिका तसेच संबंधित इतर विभागांची परवानगी काढण्यात आली नाही. झाडे तोडून लाकडे एमआयडीसीतील कारखानदारांना पुरवठा करण्याची शक्यता आहे. या विरोधात सोलापुरातील सर्व पर्यावरण प्रेमी एकत्र येऊन या विरोधात लढा उभारणार आहोत. संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी तसेच त्या पटीने पुन्हा मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करावी. सुमारे 30 ते 50 वर्ष वयाची ही झाडे होती ती कोणत्याही स्थितीत तोडता येत नाहीत. संरक्षित झाडे होती. तरीही मोठ्या प्रमाणात कत्तल झाली. यामध्ये सुमारे दहा ते पंधरा कोटीचे नुकसान झाले आहे. पर्यावरणाचे नुकसान वेगळेच झाले आहे.

या प्रकरणात कशासाठी वृक्षरोप तोड करण्यात आली ? या ठिकाणी बांधकाम होत असल्यास बांधकाम परवाना तत्काळ महापालिका प्रशासनाने रद्द करावा. संबंधितांवर कठोर कारवाई करावी या मागणीसाठी प्रसंगी न्यायालयातही दाद मागण्यात येईल असेही त्यांनी स्पष्ट केले. या वृक्षतोडप्रकरणी महापालिकेत संबंधित सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांची तातडीने बैठक घेण्यात येणार आहे. यामध्ये याप्रकरणी तत्काळ कारवाईची सूचना करण्यात येईल, असे उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेस अजित चोहान, अतिश सोनार आदींसह पर्यावरण प्रेमी उपस्थित.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वस्तीगृह प्रवेश प्रक्रिया सुरू

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह उत्तर सोलापूर या वसतिगृहाची सन 2026-27 या वर्षाची प्रवेश प्रक्रिया सुरु असून त्या अनुषंगाने या वसतिगृहाचे रिक्त जागेवरील प्रवेशासाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया https://hmas.mahait.org या पोर्टलवर चालू झालेली असून ग्रामीण भागातील अनु. जाती, अनु. जमाती, विजाभज, इतर मागास वर्ग, आर्थिकदृष्ट्या मागास वंचित व दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांनी या वसतिगृहाच्या प्रवेश प्रक्रियेत सहभागी व्हावे, अधिक माहितीसाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर शासकीय वस्तीगृह उत्तर सोलापूर अशोक नगर विजापूर रोड येथे संपर्क साधावा, असे आवाहन गृहपाल सुरेश काळे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह उत्तर सोलापूर यांनी केले आहे.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वस्तीगृहात प्रवेश घेण्याचे आवाहन

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाअंतर्गत सोलापूर येथील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतीगृह अशोक नगर, विजापूर रोड सोलापूर हे मुलींचे शासकीय वसतीगृह कार्यरत आहे. सदर वसतीगृहात प्रवेशित विदयार्थ्यांना निवास व्यवस्था, भोजन व्यवस्था, शैक्षणिक साहित्य, निर्वाह भत्ता, खेळाचे साहित्य, वातानुकुलित संगणक कक्ष, सी.सी. टिव्ही कॅमेरे, शुध्द पिण्याचे पाणी, २४ तास सुरक्षारक्षक इ सोयी-सुविधा मोफत पुरवल्या जातात. सदर वसतीगृहामध्ये शासन निर्णयानुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास प्रवर्ग, खुला, अपंग, अनाथ प्रवर्गनिहाय प्रवेश प्रक्रिया राबविली जाते. सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरीता वसतीगृहातील रिक्त जागेवर इयत्ता ८ वी पासून ते उच्च/व्यावसायिक शिक्षणाच्या प्रथम वषार्साठी प्रवेश घेतलेल्या विदयाथ्यार्ना वसतीगृहाच्या प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने विदयाथ्यार्कडून प्रवेश अर्ज भरून घेण्यात येणार आहेत.

अर्ज भरण्यासाठी वेवसाईट - https://hmas.mahait.org

अधिक माहितीसाठी संबंधित वसतीगृहाशी संपर्क साधावा असे आवाहन गृहपाल क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतीगृह अशोक नगर, विजापुर रोड, सोलापूर जि सोलापूर यांनी केले आहे.

शासकीय वस्तीगृह प्रवेश वेळापत्रक पुढीलप्रमाणे

शालेय विद्यार्थी वस्तीगृह प्रवेशासाठी अर्ज करावयाचा दि.- 30 मे 2026 पर्यंत- प्रवेश प्रक्रिया अंतिम दिनांक 07 जुलै 2026

इयत्ता अकरावी बारावीवस्तीगृह प्रवेशासाठी अर्ज करावयाचा दि.- 15 जुलै 2026 पर्यंतप्रवेश प्रक्रिया अंतिम दिनांक 31 जुलै 2026

बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम-वस्तीगृह प्रवेशासाठी अर्ज करावयाचा दिनांक 15 जुलै 2026, प्रवेश प्रक्रिया अंतिम करावयाचा दिनांक 31 जुलै २०२६

मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने या योजनेचा लाभासाठी अर्ज करावे

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सामाजिक न्याय विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांचा पुरवठा करण्यात येणार आहे. सदर योजनेंतर्गत स्वयंसहाय्यता बचत गटांना त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढावे या हेतूने अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना ९० टक्के (कमाल मर्यादा रक्कम रू. ३.१५ लक्ष) शासकीय अनुदानावर मिनी ट्रॅक्टर व त्याच्या उपसाधनांचा पुरवठा करण्यात येईल. स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने खरेदी करण्याची कमाल मर्यादा रक्कम रू.३.५० लक्ष इतकी राहील. स्वयंसहाय्यता बचत गटांनी कमाल मर्यादा रक्कमेच्या १० टक्के म्हणजे रक्कम रू. ३५,०००/- स्वहिस्सा भरल्यानंतर सदर योजनेचा लाभघेता येईल.

अटी व शर्ती

- बचत गटातील सदस्य महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असावेत.
- बचत गटातील ८० टक्के सदस्य हे अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील असावेत तसेच बचत गटाचे
- अध्यक्ष व सचिव हे अनुसूचित जातीचे असणे आवश्यक आहे.
- सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र व डोमासाईल प्रमाणपत्र आवश्यक आहे. या अगोदर संबंधीत बचत गटाने सदर योजनेचा लाभ घेतलेला नसावा तसेच यापुर्वी सदर योजनेचा लाभ घेतला नसलेबाबतचे हमीपत्र आवश्यक आहे.
- बचत गटाच्या नावे राष्ट्रीयकृत बँकेत खाते असणे आवश्यक आहे.
- मिनी ट्रॅक्टर व ट्रेलर यांची नोंदणी आर.टी.ओ कार्यालयात करणे बंधनकारक आहे.

तरी सोलापूर जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील स्वयंसहाय्यता बचत गटांच्या विहित नमुन्यातील अजार्साठी सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, सात रस्ता, सोलापूर येथे दि. 15 जून 2026 रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत अर्ज सादर करावेत, असे आवाहन सहाय्यक आयुक्त समाज कल्याण श्रीम. सुलोचना सोनवणे, यांनी केले आहे.

जाहिर पब्लिकेशन योजना अर्ज क्र.६६०/२०२६ कलम ५०अ (१)

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय सोलापूर विभाग सोलापूर

सोलापूर येथील मे.सहाय्यक धर्मादाय आयुक्त सोलापूर यांच्या न्यायालयात

१) श्री महेश मधुकर कुलकर्णी
२) सौ उमा महेश कुलकर्णी } अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही } सामनेवाला

सदरकामी अर्जदार यांनी नरसिंह मंदिर व पांडुरंग मंदिर ट्रस्ट पाकणी ता उत्तर सोलापूर जि सोलापूर. नोंदणी क्रमांक ए- १२७७ (सोलापूर) या न्यासाच्या संदर्भात मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ५० (अ) (१) अन्वये संस्थेच्या योजना अर्ज या कार्यालयात दाखल केलेले आहे. सबब नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, या न्यासाचे आपले काहीही संबंध असल्यास कोणतेही हरकत /तकार नोंद करावयाची असल्यास आपण स्वत: किंवा वकिलामार्फत ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत आपली हरकत लेखी स्वरूपात दाखल करावी. ३० दिवसानंतर आपले कुठलेही प्रकारच्या हरकतीचा व कुठल्याही बाबींचा विचार केला जाणार नाही आणि एकतर्फा हुकम करून सदरचे प्रकरण निखाली काढण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त सोलापूर, यांच्या शिक्यानिशी आज दिनांक २७/०५/२०२६ रोजी दिली.

अधिक्षक
शिक्का
सार्वजनीक न्यास नोंदणी कार्यालय
सोलापूर विभाग सोलापूर

Classified - छोटी जाहीरात

निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुंसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

बोअरवेल

सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
9420766666

(सरकार मान्य)
अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता सिक्युरिटी गार्ड त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

वर-वधू

जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र
सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र
आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
उमेश माने
मो. 9353370779
रेखा बर्वे
मो. 7218370779

वाचकांसाठी निवेदन: या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

कटूसत्य शब्दकोडे



उभे शब्द : १) देशाचे संरक्षणमंत्री २) देशाचे रस्ते वाहतूक व बांधकाम मंत्री-नितीन **** ३) भीती (हिंदीत) ४) मच्छीमारी करून उदरनिर्वाह करणारा वर्ग ५) नदीवर बांधलेला साकव, ब्रीज ६) पुष्कळ, भरमसाठ ७) सावकाश मंद गतीने चालणारा एक छोटा प्राणीजीव ९) श्रवणेंद्रिय ११) एक माजी मंत्री-***** पाचपुते १६) दुसऱ्याच्या मनातील ओळखणारा १७) भारताचा माजी कर्णधार व सध्या बीसीसीआय अध्यक्ष - सौरभ *** २०) ब्रेड, केक इत्यादी पदार्थ जेथे बनविले जातात ती जागा २२) शर्ट (ग्रामीण भाषेत) २३) पाकचे माजी पंतप्रधान २७) स्त्रियांचा नाकात घालण्याचा दागिना २९) दिल्लीच्या माजी मुख्यमंत्री-** दीक्षित ३०) लष्करातील सैनिकाला शौर्याबद्दल दिले जाणारे मेडल-***** चक्र ३१) वाळवंट प्रदेश असलेले भारतातील राज्य ३२) लायब्ररी (मराठीत) ३३) चार गुणिले चार ३६) सातारा जिल्ह्यातील फुलांसाठी जगप्रसिध्द असलेले पठार ३९) जरचा साथीदार ४१) कौशल्य ४३) एखाद्या गोष्टीचा घेतलेला ध्यास ४४) ख्रिश्चन धर्मसेविका ४५) टिकून राहणे, गत उलट लिहा

आडवे शब्द : १) खा. सुनील तटकरे यांचा लोकसभा मतदारसंघ ४) जोतिबा, अंबाबाई देवस्थान पश्चिम महाराष्ट्रातील या जिल्ह्यात आहे ७) या राज्याची राजधानी पणजी आहे ८) सिंहाचे जोराचे ओरडणे १०) धांदल, घाई १२) अनिल कपूर अभिनीत एक राजकारणावर आधारित चित्रपट १३) उन्हाळ्यातील एक महिना १४) दुप्पट (इंग्रजीत) १५) कागदाचे वीस दस्त्यांचे माप, सायकलचे चाक १६/अ) श्रीगणेशाचा एक मंत्र-* गं गणपतये नम: १८) मोठा ढोल १९) दमयंती पती २०) बिहारमधील मंत्री गिरीराजसिंह यांचा लोकसभा मतदारसंघ २१) विनाकारण, नाहक २३) बनावट २८) विठ्ठल भक्तांचे पंढरीला पायी जाणे ३०) मार्ग, रस्ता ३१) राजाचे भव्य निवासस्थान ३३) सुशीलकुमार शिंदे यांचा लोकसभा मतदारसंघ ३४) पोशाख, एक म्हण-जसा देश तसा ** ३५) याचे कणीस भाजून खातात ३७) श्वसनेंद्रिय ३८) चालरूढ, पध्दत ४०) सात गुणिले तीन ४२) आश्चर्य ४४) तिरस्कार (हिंदीत) ४६) शिक्षकांना या नावाने संबोधतात ४७) पोलीस दलाच्या वाहनांच्या येण्याची सूचना करण्यासाठी मोठा आवाज करणारे लावतात ते ४८) श्रीमंतच्या विरूध्दार्थी शब्द ४९) मोफत (इंग्रजीत)

सुडोकु - 260

		7			2	4	9	
					5	2		
2	8	4		1	6	7		
	4	9			3	8	2	
			5					9
	7	2		9	4		3	1
		5	7	3	8	9		2
	6					1		
	2		6		1	3		4

अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य महान; त्यांचे विचार तळागाळात पोहोचवा: आ सचिन कल्याणशेट्टी

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी प्रतिकूल परिस्थितीत आदर्श व सर्वसमावेशक राज्यकारभार घडवून राष्ट्रनिर्मितीत मोलाचे योगदान दिले. त्यांच्या कायार्चा वारसा आणि विचार तळागाळापर्यंत पोहोचवणे ही आपली जबाबदारी आहे, असे प्रतिपादन अक्कलकोट विधानसभेचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातर्फे आयोजित त्रिशताब्दी जयंती महोत्सवाच्या सांगता सप्ताहाचे तसेच चित्र व ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन आमदार कल्याणशेट्टी यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर होते. यावेळी माजी कुलगुरू डॉ. इरेश स्वामी, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे, ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. अनिल घनवट आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी दि. २५ ते ३१ मे २०२६ या आठवड्यात विद्यापीठातर्फे विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती दिली.

आमदार कल्याणशेट्टी म्हणाले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी देशभरातील अनेक मंदिरांचा जिर्णोद्धार करण्याबरोबरच विहिरी, घाट, बारवांची निर्मिती केली. अहिल्यादेवी होळकर यांचे कर्तुत्व मोठे होते. विद्यापीठाने आज त्यांचा वारसा जपत चांगली प्रगती करत आहे. लोकप्रतिनिधी म्हणून विद्यापीठाच्या प्रगतीसाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करणार आहोत, असे त्यांनी सांगितले. डॉ. इरेश स्वामी म्हणाले, 2004 मध्ये स्थापन झालेल्या विद्यापीठाने अल्पावधीत उत्तुंग प्रगती केली आहे. प्रथम कुलगुरू म्हणून हा विकास पाहताना अभिमान वाटतो. तसेच त्यांनी अहिल्यादेवी होळकर व महात्मा बसवेश्वर यांच्या कायार्चा गौरव करत त्यांच्या विचारांचे अनुकरण करण्याचे आवाहन केले.

कुलगुरू डॉ. महानवर यांनी सांगितले की, अहिल्यादेवींच्या कायार्चा व्यापक सामाजिक प्रभाव जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी सप्ताहभर विविध कार्यक्रम आखण्यात आले आहेत. विद्यापीठात वृक्षारोपणाचा मोठा उपक्रम सुरू असून समाजातील विविध घटक त्यास सक्रिय सहाय्य करीत आहेत. कौशल्य विकासाबरोबरच विविध भाषांचे प्रशिक्षण अभ्यासक्रम शहरात सुरू करण्याची विद्यापीठाची योजना असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. जयंतीनिमित्त विद्यापीठाच्या ज्ञानस्रोत केंद्रामध्ये ग्रंथ प्रदर्शन सर्वांसाठी खुले करण्यात आले असून अहिल्यादेवींची दुर्मिळ चित्रेही येथे पाहण्यासाठी ठेवण्यात आली आहेत. विद्यार्थी व नागरिकांनी या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

छत्रपती शिवाजी स्मारक मंडळाने विद्यापीठास ५ हजार पुस्तकांची देणगी दिली. त्याबद्दल स्मारक मंडळाचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर, गंगाधर गवसने, वरदराज बंग, प्रसाद जिरांकलगीकर, माधवी कुलकर्णी, पुरुषोत्तम कारकल आदींचा सत्कार करण्यात आला. माजी कुलगुरू डॉ. इरेश स्वामी यांनीही पुस्तके भेट दिली. यावेळी व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा. देवानंद चिलवंत, प्रा. सचिन गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. तेजस्विनी कांबळे व प्रा. श्रुती देवळे यांनी केले. आभार डॉ. अनिल घनवट यांनी मानले.

जनगणना २०२७ अंतर्गत घर यादी व घरगणना कामाची आयुक्तांकडून पाहणी

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- भारत सरकारच्या जनगणना २०२७ अभियानांतर्गत पहिल्या टप्प्यात सुरू असलेल्या घर यादी व घरगणना कामाचा आढावा घेण्यासाठी आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे व उपायुक्त तथा शहर जनगणना अधिकारी आशिष लोकरे यांनी विविध चार्जची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी संबंधित चार्जमधील प्रगणक व पर्यवेक्षक यांच्याशी संवाद साधून घरगणना करताना येणाऱ्या अडचणी, तांत्रिक समस्या तसेच नागरिकांकडून मिळणारे सहकार्य याबाबत माहिती घेतली. घरगणना प्रक्रिया अचूक व सुरळीत पार पडण्यासाठी आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या. तसेच प्रगणक व पर्यवेक्षकांना येणाऱ्या अडचणींचे तात्काळ निराकरण करण्याच्या दृष्टीने संबंधित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी डॉ. सचिन ओम्बासे यांनी सांगितले की, जनगणना ही देशाच्या विकास नियोजनासाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून प्रत्येक नागरिकाने योग्य माहिती देऊन प्रशासनाला सहकार्य करणे आवश्यक आहे. घरगणना करताना प्रगणक व पर्यवेक्षक नागरिकांच्या घरी भेट देत असल्याने त्यांना आवश्यक माहिती वेळेत उपलब्ध करून द्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

उपायुक्त तथा शहर जनगणना अधिकारी आशिष लोकरे यांनी देखील प्रगणक व पर्यवेक्षकांना काम अचूक, पारदर्शक व वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. तसेच नागरिकांनी कोणतीही भीती अथवा गैरसमज न बाळगता प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

या पाहणी दौऱ्यावेळी संबंधित चार्ज अधिकारी अविनाश वाघमारे, राघवेंद्र गायधनकर यांच्यासह इतर चार्ज अधिकारी, प्रगणक व पर्यवेक्षक उपस्थित होते. तसेच जनगणना मुख्य कार्यालयातील आशिष घुले (कनिष्ठ अभियंता), संदीप भोसले व आदिनाथ कांबळे यांनीही सहभाग घेतला.

खा. मोहिते पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

अकलूज (कटूसत्य वृत्त):- खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले असून, केंद्र सरकारने प्रधानमंत्री ग्राम सडक योजना (PMGSY-IV) अंतर्गत २०२६-२७ च्या पहिल्या टप्प्यात ७.६९ कोटी रुपये खर्चाच्या सांगोला तालुक्यातील चार ग्रामीण रस्ते कामांना मंजुरी दिली आहे.

केंद्रीय ग्रामीण विकास व कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी याबाबतचे पत्र खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांना पाठवून मंजुरीची माहिती दिली आहे.

मंजूर कामे पुढील प्रमाणे आहेत.

शेरीमळा ते एसएच-386 (एकतपूर) - 1.60 कि.मी. - ₹177.95 लाख,

कोळवले वस्ती ते अजनाळे - 1.43 कि.मी. - ₹164.28 लाख,

कोळसेवस्ती ते व्हीआर-46 (हंगीरगे) - 1.30 कि.मी. - ₹168.23 लाख,

देशमुख-किसन साळगरे पाटीलवस्ती-गुंडीवस्ती ते व्हीआर-131 (कोळे) - 1.80 कि.मी. - ₹259.03 लाख,

एकूण रस्ते लांबी : 6.13 कि.मी.

मंजूर निधी : ₹7.69 कोटी,

या रस्ते कामांमुळे ग्रामीण भागातील दळणवळण, शिक्षण, आरोग्य सेवा आणि शेतीमाल वाहतुकीस मोठी चालना मिळणार असून ग्रामीण विकासाला गती मिळणार आहे.

खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे माढा मतदारसंघातील विकासकामांना मिळत असलेल्या गतीबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

भिमानगर येथे मायनरच्या पाण्यासाठी शेतकऱ्यांची 'जलबुडी'!

प्रशासन हादरले, अखेर जलसंपदा विभाग झुकला

टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):- आलेगाव बु. येथील मायनर क्रमांक ५ मधून शेतकऱ्यांना पाणी मिळावे यासाठी मंगळवारी शेतकऱ्यांनी अक्षरशः जीव धोक्यात घालून 'जलबुडी आंदोलन' छेडत प्रशासनाला हादरवून सोडले. भिमानगर येथील हायवे पुलावरून आंदोलकांनी थेट डाव्या कालव्यात उड्या घेत सात किलोमीटर अंतर पोहत पार केले. या थरारक आंदोलनानंतर अखेर जलसंपदा विभागाला माघार घ्यावी लागली असून ३१ मेपर्यंत तांत्रिक दुरुस्ती करून शेतकऱ्यांच्या मागणीनुसार पाणी देण्यात येईल, असे लेखी व तोंडी आश्वासन सोलापूर येथील जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत कडूसकर यांनी दिले. त्यामुळे सात जलसमाधी आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले.

आलेगाव खुर्द ते भांडगाव दरम्यान भिमा नदीवर तातडीने बंधारा उभारावा तसेच आलेगाव खुर्द परिसरातील शेतकऱ्यांना मायनर क्रमांक ५ मधून नियमित पाणीपुरवठा करावा, या प्रमुख मागण्यांसाठी शेतकरी आक्रमक झाले होते. दुपारी भिमानगर येथे सुरू झालेल्या आंदोलनाने काही वेळातच नाट्यमय वळण घेतले. आंदोलकांनी पुलावरून थेट कॅनॉलमध्ये उड्या घेत प्रशासनाला इशारा दिला.

हरिभाऊ माने, नंदकुमार गायकवाड, ओंकार गायकवाड, सचिन गायकवाड, गणेश शिंदे, रोहित काळे, महेश गाडे, नवनाथ कळसाईत आदी आंदोलकांनी कॅनॉलमध्ये उतरून जीवाची पर्वा न करता पोहत आलेगाव बुद्रुकपर्यंतचा सात किलोमीटरचा प्रवास पूर्ण केला. या धाडसी आंदोलनामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली होती.

आंदोलनाची तीव्रता लक्षात घेऊन प्रशासनाने तातडीने हालचाली सुरू केल्या. आलेगाव बुद्रुक येथे जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत कडूसकर यांनी आंदोलकांची भेट घेतली. त्यांनी शासनास मंजुरीसाठी प्रस्ताव पाठविल्याचे सांगत मायनर दुरुस्तीचे काम तातडीने सुरू करण्यात येईल व शासन मान्यता मिळाल्यानंतर शेतकऱ्यांच्या सेवेसाठी मायनर कार्यान्वित करून नियमित पाणीपुरवठा केला जाईल, असे लेखी पत्र आंदोलकांना सुपूर्द केले.

या आंदोलनामुळे प्रशासन सतर्क झाले होते. घटनास्थळी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. आरोग्य विभागाची पथके, आपत्कालीन यंत्रणा व अधिकारी वर्ग सज्ज ठेवण्यात आला होता. उपकार्यकारी अभियंता इंगळे, शाखा अभियंता भोयर, शाखा अभियंता पाटील यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी घटनास्थळी उपस्थित होते.

यावेळी राजेंद्र पाटील, सुभाष गायकवाड, दिनकर गायकवाड, दादा कळसाईत, गणेश देवकते, ज्ञानेश्वर देवकते, अशोक कळसाईत, शहाजी निकम, कालिदास गायकवाड, गणेश कवडे, निलेश पाटील यांच्यासह शेकडो शेतकरी व आंदोलक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, आंदोलनकर्ते हरिभाऊ माने यांनी प्रशासनाला इशारा देताना सांगितले की,

'शासनाने यानंतरही दखल घेतली नाही अथवा अंमलबजावणी केली नाही, तर मंत्रालयात जलसंपदा मंत्र्यांच्या कार्यालयासमोर उजनी प्रकल्पग्रस्तांचा आक्रोश जागर आंदोलन छेडण्यात येईल.'

या धाडसी आंदोलनामुळे उजनी प्रकल्पग्रस्तांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून आता प्रशासन दिलेले आश्वासन कितपत पूर्ण करते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

सोलापूर शहरात मनाई आदेश लागू - १५ दिवसांसाठी निर्बंध

सोलापूर,(कटूसत्य वृत्त):- सोलापूर शहरात सार्वजनिक शांतता आणि सुरक्षितता राखण्यासाठी पोलीस उप आयुक्त (गुन्हे/विशा) डॉ. अश्विनी पाटील यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ अन्वये मनाई आदेश जारी केले आहेत. हा आदेश दि. २५ मे २०२६ रोजी रात्री ००.०१ वाजता लागू झाला असून तो दि. ८ जून २०२६ रोजी मध्यरात्री २४.०० वाजेपर्यंत लागू राहणार आहे.

या आदेशानुसार शस्त्रे, अग्निशस्त्रे, तलवारी, भाले, दंडुके, चाकू, लाठ्या, स्फोटके, क्षेपणास्त्रे, उपरोधिक पदार्थ तसेच सार्वजनिक ठिकाणी टिकाकरण, उत्तेजक गाणी, संगीत वाजवणे, अश्लील चित्रे किंवा चिन्हे प्रदर्शित करणे यावर बंदी घालण्यात आली आहे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असून जप्त केलेली शस्त्रे व वस्तू राज्य सरकारकडे जमा करण्यात येतील.

तसेच पाच किंवा अधिक व्यक्तींच्या संमेलनास, मिरवणुकीस, लाऊडस्पीकर, वाद्ये, बँड व फटाके फोडण्यास मनाई करण्यात आली आहे. मात्र विवाह समारंभ, अंत्यसंस्कार, कायदेशीर सभा, शैक्षणिक उपक्रम, कारखाने, दुकाने, चित्रपटगृहे, नाटकगृहे, सरकारी कार्ये व परवानगी दिलेल्या संमेलनांना या आदेशातून सूट देण्यात आली आहे.

हा आदेश सोलापूर शहरातील सार्वजनिक ठिकाणी, न्यायालये व सरकारी कार्यालयांमध्ये चिकटवून तसेच लाऊडस्पीकर, मेगाफोन व प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

सिध्देश्वर प्रशाला साखर कारखाना कुमठे येथे माजी विधार्थ्यांचा मेळावा उत्साहात

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सिध्देश्वर प्रशाला साखर कारखाना कुमठे येथे माजी विधार्थ्यांचा मेळावा उत्साहात पार पडला. शाळेत १९९१ या वर्षात शिकलेले माजी विध्यार्थी यात सहभागी झाले होते. ३५ वर्षानंतर भेट झाल्यामुळे हे माजी विधार्थी भारावले होते. मुख्याध्यापक काशिनाथ आकाशे यांनी पेन व गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. प्रमुख पाहुणे म्हणून अंबण्णा कल्याणशेट्टी, राजेंद्र कलशेट्टी, योगिनाथ चांगले, रामचंद्र बिराजदार आदी उपस्थित होते. प्रारंभी सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तब्बल 35 वषार्नंतर एकमेकांची भेट झाल्याने वातावरण देखील भावुक झाले होते. अनेक विध्यथ्यांनी जुन्या आठवणीना उजाळा दिला. तसेच एकमेकांची आस्थेने विचारपूस केली. शाळेमुळेच आपली प्रगती झाल्याचे माजी विद्यार्थ्यांनी सांगितले. यावेळी सुनिल चव्हाण,गुरुप्रसाद तिवारी, गणेश कोरे, अमित सुमंत, भारत साळुंखे, रोशनी शेंडगे, अबेदा शेख, अतुल भोसले, चंद्रकला सोलापूरे, राहुल ननावरे, राजेंद्र इंगळे राहुल जाधव, बाळु कांबळे, प्रमोद चव्हाण, राजाराम देठे, अंबरनाथ पाटील, अनिता जगताप, नागनाथ गवंडी, वैभव वायचळ, विदुला बनसोडे आदी उपस्थित होते.

पोलीस संरक्षण ते पेन्शन

प्रदेशाध्यक्ष मनिष केत यांच्याकडून मुख्यमंत्र्यांना विविध मागण्यांचे निवेदन

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष तथा नगरसेवक मनीष केत यांनी मंगळवारी मुंबईतील मंत्रालयात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत विविध पत्रकारांच्या प्रश्नांबाबत चर्चा केली. यावेळी सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खिलबुडे, पत्रकार महेश हणमे आदी उपस्थित होते.

या भेटीत पत्रकारांच्या विविध मागण्यांचे निवेदन मुख्यमंत्री फडणवीस यांना देण्यात आले. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य संघटक संजय भोकरे यांना तातडीने पोलीस संरक्षण द्यावे, ज्येष्ठ पत्रकारांच्या पेन्शन संदर्भात सकारात्मक निर्णय घ्यावा, सोलापूर श्रमिक पत्रकार गृह निर्माण प्रकल्पातील तांत्रिक अडचणी सोडवण्यासाठी बैठक आयोजित करावी तसेच माध्यम व्यवसायातील अनुभव प्राध्यापक पदासाठी ग्राह्य धरण्यात यावा, अशा मागण्या करण्यात आल्या.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांच्या विविध प्रश्नांबाबत सकारात्मक भूमिका घेत शासन पत्रकारांच्या विकासासाठी आणि त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी कायम सोबत असल्याचा विश्वास दिला.

मच्छीमार बांधवांसाठी श्रीमती इंगवले यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश

करमाळा (कटूसत्य वृत्त):- करमाळा तालुक्यातील मच्छिमार बांधवांना श्रीमती पद्मजा इंगवले यांच्या पाठपुराव्यामुळे, होडी तसेच इतर साहित्य मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. कारण करमाळा तालुक्यातील उजनी धरणाच्या आजूबाजूच्या गावात राहणाऱ्या मच्छिमार बांधवांना सदरचे साहित्य मिळावे. यासाठी श्रीमती पद्मजा इंगवले यांनी मत्स्यव्यवसाय आणि बंदरे मंत्री नितेश राणे, यांना भेटून तालुक्यातील विधवा, गरिब व गरजवंत मच्छिमार महिलांना विविध साहित्य मिळावे. यासाठी निवेदन दिले होते. सदरच्या निवेदनाची दखल घेऊन नितेश राणे यांनी प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालय, पुणे विभाग व सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालय, सोलापूर येथील कार्यालयांना तातडीने उजनी जलाशयाच्या कडेला राहणाऱ्या गावातील मच्छिमार बांधवांचे अर्ज व कागदपत्रे स्वीकारणे. तसेच येथील सर्व्हेक्षण करण्याचे आदेश दिले होते. त्याप्रमाणे भीमाशंकर पाटील (सहाय्यक आयुक्त मत्स्य व्यवसाय सोलापूर), राजेश पाटील (मत्स्य व्यवसाय विकास अधिकारी सोलापूर), विनोद वाघमोडे (वरीष्ठ लिपिक सोलापूर) यांच्यासह सामाजिक कार्यकर्त्या तसेच शिवसेनेच्या जिल्हाध्यक्ष श्रीमती पद्मजा इंगवले यांनी उपस्थित राहुन केत्तुर-1, केत्तुर-2, पारेवाडी, दहिगाव, चिखलठाण या गावातील गरजू लाभार्थ्यांची कागदपत्रे संबंधित अधिकाऱ्यांनी स्वीकारली.

आजपर्यंत करमाळा तालुक्यात आमच्यासाठी कोणी काहीच केले नाही. आमचा फक्त प्रत्येकजण मतासाठी वापर करतो. परंतू मच्छिमारांच्या देखील काही अडचणी असतात. आणि त्या सोडविण्यासाठी तालुक्यातील विविध पक्षांच्या लोकप्रतिनिधींनी लक्ष देणे गरजेचे आहे. परंतू तसे होताना दिसून येत नाही. परंतू सामाजिक कार्यकर्त्या व शिवसेनेच्या जिल्हाध्यक्षा पद्मजाताई इंगवले या विधवा महिलांना मान-सन्मान मिळावा. महिला सक्षमीकरण व तालुक्यातील विविध मुद्दयांवर सातत्याने आवाज उठवत असतात. त्यामुळे श्रीमती इंगवले ह्या मच्छिमारांसाठी करत असलेले काम आमच्यासाठी सदैव आठवणीत राहील.

- बेबीताई कणिचे, केत्तुर-2

यावेळी श्रीमती इंगवले यांनी बोलताना सांगितले कि, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच महायुती सरकार लाडक्या बहिणींसाठी सदैव तत्पर आहे. याचा विचार करुनच तालुक्यातील मच्छिमार बहिणींच्या हिताचा विचार करुन, त्यांना सदरचे साहित्य लवकरात-लवकर मिळणार आहे. तरी तालुक्यामधील विविध गावातील अशा विधवा, गरिब व गरजू अनेक लाभार्थी मच्छिमार महिला त्यांची कागदपत्रे आमच्याकडे लवकरच जमा करणार आहेत. त्यांना देखिल याचा लाभ मिळावा. यासाठी मी प्रयत्नशील राहणार आहे. अशा प्रकारे श्रीमती इंगवले यांनी सांगितले.

यावेळी मत्स्य विभागाशी संबंधित अधिकाऱ्यांचा जेऊर येथे संयम ग्रुपच्या वतीने सन्मान करण्यात आला. तर तालुक्यातील विविध गावांमध्ये मच्छिमार बांधवांनी मोठ्या आनंदात श्रीमती पद्मजा इंगवले व अधिकाऱ्यांचा सन्मान केला.

कुरनूर धरणावरील बिघाड १२ तासांत दूर; अक्कलकोटचा पाणीपुरवठा पूर्ववत

अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):- शहराच्या पाणीपुरवठ्यात अडथळा निर्माण करणारा कुरनूर धरणावरील १२० एचपी क्षमतेच्या मोटार पंपातील तांत्रिक बिघाड नगरपरिषदेच्या तत्परतेमुळे अवघ्या १२ तासांत दूर करण्यात आला. त्यामुळे तब्बल तीन दिवस पाणीपुरवठा बंद राहण्याची शक्यता टळली असून बुधवारपासून शहराचा पाणीपुरवठा पूर्ववत होणार आहे.

अक्कलकोट शहराला कुरनूर धरणातून पाणीपुरवठा केला जातो. धरणावरील पंप हाऊसमधील मोटार पंपात बिघाड झाल्याने सोमवारी रात्रीपासूनच दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले होते. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील वाढती पाण्याची गरज लक्षात घेऊन नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी व पाणीपुरवठा सभापती देविदास कवटगी यांनी कुरनूर धरणावर प्रत्यक्ष भेट देत कामाचा आढावा घेतला.

मुख्याधिकारी रमाकांत डाके यांनी पाणीपुरवठा विभागप्रमुख मनोज ईश्वरकट्टी यांना तत्काळ दुरुस्तीचे आदेश दिल्यानंतर तांत्रिक पथकाला पाचारण करण्यात आले. नगराध्यक्षांनीही कर्मचाऱ्यांशी चर्चा करून काम जलदगतीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. प्रशासनाने सुरुवातीला दुरुस्तीसाठी सुमारे ७२ तास लागू शकतात, असा अंदाज व्यक्त केला होता. मात्र सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि समन्वयामुळे हे काम अवघ्या १२ तासांत पूर्ण करण्यात यश आले.

दरम्यान, नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांनी सांगवी जलाशयाचीही पाहणी केली. जलाशयात केवळ चार ते पाच दिवस पुरेल एवढाच पाणीसाठा शिल्लक असल्याने पुढील नियोजनाबाबत पाणीपुरवठा विभाग व प्रशासनासोबत चर्चा करण्यात आली. शहराच्या पाणीपुरवठ्यावर परिणाम होऊ नये, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली.

सध्या अक्कलकोट शहराला दहा दिवसांतून एकदा पाणीपुरवठा केला जात असून, या बिघाडामुळे पुरवठा उशिराने होण्याची शक्यता निर्माण झाली होती. मात्र, वेळेत दुरुस्ती पूर्ण झाल्याने नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

वाशिंबेमध्ये महिलांच्या गळयातील दागिने व मोबाईल, मोटारसायकलची चोरी

वाशिंबे (कटूसत्य वृत्त):- २७ मे च्या मध्यरात्री १.३० वाजता घरासमोर झोपलेल्या महिलांच्या गळयातील सोन्याचे दागिने हिसकावून घेत व पाच जणांचे मोबाईल फोन चोरीची घटना घडली.प्रत्यक्षदर्शी सांगितले की चोर ५ ते ६ जण आहे .तोंडाला मास्क लावून चोरी करत आहेत.या घटनेने गावामधील तरुणांनी मध्यरात्री एकमेकांना फोन करून व ग्रामसुरक्षा यंत्रणेने संपुर्ण गावामध्ये कॉल करत नागरिकांना सतर्क केले. दोन दिवसांपूर्वी गावातील कानडे यांची मोटारसायकल चोरी गेली आहे.मागील महिन्यात नांगी चारी येथे नदीवरील विद्युत, केबल व पंपामधील ताब्यांच्या ताराची चोरी झाली होती.परिसरात नागरिकांमध्ये अशा घटनांबाबत भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. वाशिंबेचे पोलिस पाटीलः संजय पाटील यांनी घटनेची सविस्तर माहिती पीएसआय बनकर,बिट अंमलदार पवार,आर्किले याना संपर्क करत करमाळा पोलिस स्टेशनला दिली आहे. ही चोरीची मालिका थांबवण्यासाठी पोलिसांनी गस्त देत लवकरच आरोपींना अटक करावी,अशी आशा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

मोहोळ तालुक्यात चोरट्यांचा धुमाकूळ

हराळवाडीत एका रात्रीत सहा घरफोड्या

मोहोळ (कटूसत्य वृत्त):- सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यात चोरट्यांनी अक्षरशः धुमाकूळ घालत हराळवाडी गावात एका रात्रीत सहा घरफोड्या केल्या आहेत.अंधाराचा आणि उन्हाळ्या असल्याने उकाडयामुळे नागरिक बाहेर झोपल्याचा फायदा घेत चोरट्यांनी सोने-चांदीचे दागिने, रोख रक्कम आणि मौल्यवान वस्तूंवर हात साफ केला.या घरफोड्यांमध्ये जवळपास १० लाख रुपयांचा ऐवज चोरीला गेला असून पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत.

मोहोळ तालुक्यातील हराळवाडी गाव मंगळवारी मध्यरात्री चोरट्यांच्या निशाण्यावर आले.गावातील नागरिक उन्हाळ्यामुळे घराबाहेर झोपले असताना चोरट्यांनी अंधाराचा फायदा घेत एकामागून एक तब्बल सहा घरे फोडली.

चोरट्यांनी घरातील कपाटे आणि लॉकर फोडून सोने-चांदीचे दागिने, रोख रक्कम तसेच इतर मौल्यवान वस्तूंवर डल्ला मारला.प्राथमिक माहितीनुसार जवळपास ६ तोळे सोन्यासह सुमारे १० लाख रुपयांचा ऐवज चोरून नेण्यात आला आहे.

सकाळी चोरीचा प्रकार उघडकीस आल्यानंतर गावात मोठी खळबळ उडाली.घटनेची माहिती मिळताच कामती पोलीस स्टेशनचे अधिकारी आणि पोलीस कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले.पोलिसांनी पंचनामा सुरू करत तपासाची सूत्रे हाती घेतली आहेत.

घटनास्थळी फॉरेन्सिक टीमला पाचारण करण्यात आले असून डॉग स्कॉडच्या मदतीने चोरट्यांचा माग काढण्याचा प्रयत्न सुरू आहे. एका रात्रीत सलग सहा घरफोड्या झाल्याने हराळवाडी परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी लवकरात लवकर आरोपींना अटक करण्याचे आव्हान उभे ठाकले आहे.